# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### कृष्णापूर (ता.चोपडा, जि.जळगांव) आश्रमशाळेची इमारत व वसतीगृह बांधकामाबाबत

**(१) ४५६७४ (२१-०९-२०२२). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णापूर, (ता.चोपडा, जि.जळगांव) येथे शासकीय निवासी आश्रम शाळा भाड्याच्या जागेत सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृष्णापूर आश्रमशाळेची इमारत व वसतीगृह बांधकामासाठी लागणाऱ्या रु.१४.०० कोटी रुपयांचा प्रस्ताव आयुक्त, आदिवासी विकास विभाग, यांनी शासनाकडे सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाला मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिधिंनी आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे दि.१ फेब्रुवारी, २०२० रोजी व मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दि.१७ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२०-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

कृष्णापूर आश्रमशाळेची इमारत व वसतिगृह बांधकामासाठी लागणाऱ्या रु.१४.९९ कोटी अंदाजित किंमतीचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही जागा उपलब्ध झाल्यानंतर करण्याचे नियोजन आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) कृष्णापूर, ता.चोपडा जि.जळगाव आश्रमशाळा संकुलाकरिता जागा उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. जागा प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही पूर्ण करून काम सुरू करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

### चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील शेतकरी, बागायतदार यांना शेतीसाठी पुरेश्या दाबाने अखंडित वीज पुरवठा होण्याबाबत

**(२) ४५६८६ (२१-०९-२०२२). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील शेतकरी, बागायतदार यांना शेतीसाठी पुरेश्या दाबाने व अखंडित वीज पुरवठा होण्यासाठी येणा-या विविध समस्या सोडवण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी उर्जामंत्री यांच्याकडे दिनांक १५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास व तद्पूर्वी अनेक वेळा लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
लोकप्रतिनिधी यांनी दि.२२.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. ऊर्जामंत्री यांच्याकडे चोपडा मतदार संघात पुरेश्या दाबाने व अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी येणाऱ्या समस्या सोडविण्याबाबत बैठक घेण्याबाबतची मागणी केलेली आहे.
(२) चोपडा मतदारसंघातील भविष्यातील वीजेची मागणी लक्षात घेऊन सुधारीत वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (RDSS) उनपदेव, वरगव्हाण, धनवाडी व नागलवाडी येथे नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले आहेत. यावल तालुक्यातील गायरान येथे नवीन ३३/११ केव्ही उपकेंद्र उभारण्याबाबत तांत्रिकदृष्टया पडताळणी करुन नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

तसेच चोपडा मतदारसंघातील वर्डी व चाहर्डी उपकेंद्र येथे ५ एम.व्ही. ए. क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र सुधारीत वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (RDSS) प्रस्तावित करण्यात आले आहेत. चोपडा मतदारसंघातील गालंगी व हातेड उपकेंद्र येथे ३.१५ ते ५ एम.व्ही. ए. तसेच चोपडा व गोरगवळे उपकेंद्र येथे ५ ते १० एम.व्ही. ए. सुधारीत वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (RDSS) प्रस्तावित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे तालुक्यात विदयुत कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(३) ४६५४१ (१४-१०-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे तालुक्यात एकच विदयुत कर्मचारी कार्यरत असून तळेगांव दशासर या गावातील वीजेचे काम करण्याकरीता ८-९ वायरमनची नियुक्ती करण्याबाबत या कार्यालयास वारंवार कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तांत्रिक प्रवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (धामण्गाव रेल्वे) यांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त सुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी कार्यकारी अभियंता, अमरावती ग्रामीण विभाग यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०२१९ रोजी अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या, संवसु मंडळ, अमरावती यांना पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यातील अमरावती ग्रामीण विभागाअंतर्गत धामणगाव रेल्वे तालुक्यामध्ये एकूण ८९ मंजूर पदे असून त्यापैकी ६६ नियमित व १७ बाह्यस्त्रोत असे एकूण ८३ तांत्रिक कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच तळेगाव दशासर गावामध्ये १२ मंजूर पदे असून त्यापैकी ९ नियमित व ३ बाह्यस्त्रोत असे एकूण १२ तांत्रिक कर्मचारी कार्यरत आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सन २०१९ "विद्युत सहाय्यक" या संवर्गाची एकूण ५००० पदे भरण्याकरीता महावितरण कंपनीतर्फे जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. दि. ०१.१०.२०२२ रोजी ई. डब्ल्यू. एस. प्रवर्ग वगळून एकूण ४५३४ उमेदवारांचा निकाल प्रसिध्द करण्यात आला होता. निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ दरम्यान संबंधित परीमंडळ कार्यालयामार्फत करण्यात आली आहे. अमरावती परिमंडळ कार्यालयात एकूण २६१ उमेदवार नियुक्ती करिता वर्ग करण्यात आले होते. यापैकी कागदपत्रे पडताळणीनंतर १४५ पात्र उमेदवारांच्या नियुक्त्यांची कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदिठाणे (ता.भिवंडी, जि.ठाणे) गावातील मुंबई-बडोदा महमार्गावरील संपादित केलेल्या जमिनीबाबत**

**(४) ४६५७९ (३१-१०-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदिठाणे (ता.भिवंडी, जि.ठाणे) गावातील मुंबई-बडोदा महमार्गासाठी संपादित केलेल्या जमिनी आठ शेतकऱ्यांची बनावट कागदपत्रे तयार करुन ११ कोटी ६६ लाख ६४ हजार रुपयांची रक्कम परस्पर काढून शासनाची फसवणूक केल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१) व (२) होय.

मौजे नांदिठाणे, ता. भिवंडी जि. ठाणे येथील संपादित जमिनीचा मोबदला मिळण्याकरिता मूळ खातेदारांच्या नावाचे बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड तयार करून बनावट दस्त तयार करून उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचे कार्यालयात सादर केले व त्या कागदपत्रांच्या आधारे मुंबई-बडोदा द्रुतगती महामार्गासाठी मौजे नांदिठणे, ता. भिवंडी जि. ठाणे येथील संपादीत करण्यात आलेल्या जमिनीचा रू.११,६६,६४,६१४/- मोबदला घेऊन शासनाची फसवणूक केल्याबाबत अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, भिवंडी, जि. ठाणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दि. २५/०४/२०२२ रोजी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत शांतीनगर पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. २३२/२०२२, भा. दं. वि. कलम ४०९, ४०६, ४२०, ४६४, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

(३) पोलीस स्टेशन स्तरावर वेगवेगळी पथके तयार करून या गुन्हयातील अज्ञात आरोपींचा शोध घेण्यात आला आहे. सदर प्रकरणी एकूण १९ आरोपींना अटक केली असून, गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ओशिवरा येथील (मुंबई उपनगर) म्हाडाचा भूखंड युटीआय कर्मचा-यांच्या ''साईसमृध्दी''**
**सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्यात आल्याबाबत**

**(५) ४६६३२ (२५-०९-२०२२). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओशिवरा येथील (मुंबई उपनगर) म्हाडाचा १० हजार ५०३ चौरस मीटर भूखंड युटीआय कर्मचाऱ्यांच्या "साईसमृध्दी" सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्यात आल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भूखंडातील ३ हजार चौरस मीटर भूखंड मा.उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या "सुरभी" सहकारी गृहनिर्माण संस्थेला माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यायाधीशांच्या गृहनिर्माण संस्थेची घरे उभारणीसाठी म्हाडाकडून जादाची रक्कम आकारल्याने सदरहू गृहनिर्माण संस्थेने म्हाडा अधिकाऱ्यांचा हा भ्रष्टाचाराचा नवा प्रकार असल्याने उक्त भूखंडाच्या रक्कमेचा फेरविचार करावा अशी विनंती मुंबई गृहनिर्माण मंडळास केल्यानंतर सदरहू मंडळाने म्हाडाने आकारलेल्या भरमसाठ रक्कमेचा फेरविचार करण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदनुषंगाने उक्त भूखंडाबाबत म्हाडाने आकारलेल्या जादाच्या किंमतीबाबत निर्णय घेण्यासह त्यासंबंधित दोषी असलेल्या म्हाडाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

मा. न्यायाधीशांच्या सुरभी गृहनिर्माण संस्थेकरीता रु.१५९,९३,६६,०२२/- एवढया रक्कमेची प्रशासकीय मान्यता म्हाडाने दि.२२/१/२०२० रोजी दिली आहे. तद्नंतर, उक्त संस्थेच्या गृहनिर्माण योजनेच्या सुधारित नकाशांना दि.२५/११/२०२२ रोजी म्हाडाकडून मंजूरी दिली आहे. त्यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव म्हाडाच्या स्तरावर तयार करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आदिवासी जात वैधतेची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(६) ४६९१२ (०९-१०-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ८ अनुसूचित पडताळणी समितीकडून अवैध ठरविलेली ३०१६ प्रकरणे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठात व सर्वोच्च न्यायालयात माहे जून, २०२१ पर्यंत प्रलंबित होती, हे खरे आहे काय,
(२) तसेच, ५३९९ प्रकरणे मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने समितीकडे पुनर्विचार करण्यासाठी पाठविली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.न्यायालयाने पुनर्विचाराकरिता पाठविण्यात आलेली प्रकरणे पुन: तपासून त्यावर निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२३-०२-२०२३) :** (१) माहे जून, २०२१च्या मासिक प्रगती अहवालानुसार मा. उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठात व मा. सर्वोच्च न्यायालयात एकूण ३०४३ प्रकरणे प्रलंबित होती.
(२) माहे जून, २०२१ च्या मासिक प्रगती अहवालानुसार मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाने समितीकडे १२६५ प्रकरणे पुर्नविचारार्थ (Remanded back) पाठविली होती.
(३) मा. न्यायालयाने पुनर्विचाराकरीता समितीकडे परत पाठविलेल्या १२६५ प्रकरणांपैकी ६९८ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून ५६७ प्रकरणावर अंतिम निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## भुसावळ शहरात खुन, घरफोडी व गावठी कट्टे मिळण्यासारख्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(७) ४६९४७ (३१-१०-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ शहरातील परिसरात खुन, घरफोडया होत असून गावठी कट्टे (बंदूक) मिळत असल्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटना रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :**(१) भुसावळ शहर परिसरात दाखल गुन्ह्यांची आकडेवारी पाहता सन २०२१ च्या तुलनेत सन २०२२ मध्ये खून, घरफोडीच्या घटनांमध्ये घट झाली असून गावठी कट्टे (बंदूक) प्रकरणी काही प्रमाणात वाढ दिसून येत आहे.

| दाखल गुन्हे | सन २०२१ | सन २०२२ |
|---|---|---|
| खून | ०६ | ०२ |
| घरफोडी | २९ | २५ |
| आर्म्स ॲक्ट ३/२५ | ०५ | ०८ |

(२) भुसावळ शहारामधील अशा घटना रोखण्यासाठी सन २०२२ मध्ये एकूण १४ गुन्हेगारांवर मु. पो. का. कलम ५५, ५६ व ५७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच गुन्हेगारीला आळा घालण्याच्या दृष्टिकोनातून नियमितपणे परिणामकारक रात्रगस्त घालण्यात येत आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## भुसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विदयुत पुरवठासंदर्भातील अनेक अडचणीबाबत

**(८) ४६९४९ (१४-१०-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) तालुक्यात वारंवार विज खंडीत होणे, रोहित्र नादुरुस्त होणे तसेच रोहित्र वेळेवर न देणे यामुळे शेतक-यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणी पुरवठा योजनांचे सुरु असलेल्या महिन्याचे देयक अदा करुन देखील विज जोडणी बंद केली जात आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

भुसावळ तालुक्यात दि.०१.०४.२०२२ ते ३१.१०.२०२२ या सात महिन्याच्या कालावधीत ११ वाहिन्यांचा वीज पुरवठा आपत्तकालीन भारनियमनामुळे मासिक सरासरी सव्वा दोन तास व तांत्रिक बिघाड तसेच नैसर्गिक आपत्ति जसे वादळ, वारा, पाऊस, वीज कोसळणे इ. कारणामुळे मासिक सरासरी सव्वा तीन तास वीजपुरवठा खंडीत झाला होता.
(२) हे खरे नाही.

भुसावळ तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेच्या ग्राहकांनी चालू महिन्याचे देयकाचा भरणा केला असल्याने सद्यस्थितीत दोन्ही ग्राहकांचा वीज पुरवठा सुरळीत सुरु आहे.
(३) तांत्रिक बिघाड तसेच नैसर्गिक आपत्ति जसे वादळ, वारा, पाऊस, वीज कोसळणे इ. कारणामुळे शेतकऱ्यांचा वीजपुरवठा खंडीत झाल्यास महावितरणचे कर्मचारी व सूचिबध्द कंत्राटदारांमार्फत कमीत कमी वेळेत वीज पुरवठा प्राधान्याने सुरळीत करण्यात येतो. तसेच नादुरुस्त रोहित्र उपलब्धतेनुसार व नादुरुस्त कृषी रोहित्रावरील ८० % कृषी ग्राहकांनी चालू बिलाचा भरणा केला असल्यास नादुरुस्त रोहित्रे बदलण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरात ग्राहकांना नवीन वीजजोडण्या मिळत नसल्याबाबत

**(९) ४७१७८ (१४-१०-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरणाने नवीन वीजजोडणी देण्यासंदर्भात परिपत्रक काढले असल्याचे माहे जानेवारी,२०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिपत्रकानुसार किती ग्राहकांना नवीन वीजजोडण्या देण्यात आल्या असून विशेषत: पुणे जिल्ह्यातील अद्याप बऱ्याच नवीन वीजजोडण्या देणे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन प्रलंबित ग्राहकांना नवीन वीजजोडण्या तातडीने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यासुमारास महावितरणने नवीन वीज जोडणी संदर्भात कोणतेही परिपत्रक पारीत केलेले नाही, परंतु नवीन वीजजोडणी देण्यासंदर्भात महावितरणच्या सांघिक कार्यालयाकडून वेळोवेळी मार्गदर्शक सूचना देण्यात येतात. सद्यस्थितीत परिपत्रक दि.१९.०२.२०२१ नुसार मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच या परिपत्रकानुसार नवीन वीजजोडणी देण्याचे काम चालू आहे.
(२) हे खरे नाही.
सन २०२२-२३ मध्ये (नोव्हेंबर-२०२२ अखेर) एकूण १,०२,२३१ ग्राहकांना नवीन वीज जोडणी देण्यात आल्या व नोव्हेंबर २०२२ अखेर १७,१०७ इतके नवीन वीज जोडणी अर्ज पैसे भरुन वीज जोडणीच्या प्रक्रियेत आहेत. महावितरणतर्फे पुणे जिल्हयात अंदाजे २ लाख ग्राहकांना दरवर्षी महावितरणच्या प्रचलित नियमावलीनुसार नवीन वीज जोडणी देण्यात येतात.
(३) महावितरणमार्फत नियमितपणे वीजजोडण्या देण्याचे काम सुरु असते. सदर परिपत्रकामुळे कोणत्याही नवीन वीजजोडण्या देणे प्रलंबित नाही. तसेच, वीज जोडणी अर्ज प्रलंबित असल्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खार (मुंबई) परिसरात पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरिक्षक यांनी लाच मागितल्याबाबत**

**(१०) ४७२१९ (३१-१०-२०२२). कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खार (मुंबई) परिसरातील एका धोकादायक इमारतीतील दुकाने असलेल्या व्यापाऱ्याच्या विरोधातील तक्रारीवरुन गुन्हा दाखल न करण्यासाठी खार पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरिक्षक यांनी व्यापाऱ्याकडे ८० हजार रुपयांची लाच मागितल्याचा प्रकार निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ७० हजार रुपयांची लाच घेणाऱ्या सहाय्यक पोलीस निरिक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात सहाय्यक पोलीस निरिक्षकावर कोणता गुन्हा दाखल करण्यात आला असून वर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) होय, खरे आहे.
मुंबई परिसरातील परिमंडळ ९ अंतर्गत खार पोलीस ठाणे येथे फिर्यादी यांच्या मालकीच्या मन्सुरी मेन्शन, ३७ वी गल्ली, बांद्रा पश्चिम, मुंबई या इमारतीला बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून धोकादायक इमारत म्हणून नोटीस बजावण्यात आली होती. त्यामुळे फिर्यादी यांनी या इमारतीच्या आजुबाजूस लोखंडी पत्रे लावले. त्यामुळे या इमारतीमधील दुकानदारांनी दुकानामध्ये ये-जा करण्यासाठी बेकायेदशीर प्रतिबंध केला असल्याबाबत फिर्यादी यांचे विरोधात खार पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती.
नमूद तक्रार अर्जाच्या अनुषंगाने फिर्यादी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल न करण्यासाठी रु. ८०,०००/- इतक्या लाचेच्या रकमेची आरोपी लोकसेवक सहायक पोलीस निरीक्षक यांनी मागणी केली.
(२) व (३) होय खरे आहे.
फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गु.र.क्र. २८/२०२२ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये गुन्हा नोंद करुन, नमुद गुन्हयात आरोपी लोकसेवक यांना दि. ३१.०५.२०२२ रोजी अटक केलेली आहे. त्यामुळे आरोपी लोकसेवक यांना दि.०२.०६.२०२२ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्याकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाकडी(ता.भोकरदरन, जि.जालना) येथील सिंगल फेजचे रोहित्र जळाले असल्याबाबत

**(११) ४७५९७ (१२-१०-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकडी (ता.भोकरदरन, जि.जालना) येथील सिंगल फेजचे रोहित्र जळाल्याने मागील दोन महिन्यापासून वाकडी गाव आंधारात असल्याची बाब माहे मे , २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाकडी गावातील रोहित्र मागील वर्षीही अनेक दिवस बंद होते यामुळे येथील नागरिकांनी सदर रोहित्र नवीन देण्याची मागणी महावितरणकडे करूनही देण्यात येत नसल्याने विजेअभावी अनेक कामे अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, वाकडी गावातील रोहित्र तात्काळ बदलून न दिल्यास स्थानिकांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे हे खरे आहे काय ,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाकडी गावातील रोहित्र बदलून नवीन रोहित्र देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

वाकडी या गावातील दिनांक १७.०३.२०२२ रोजी २५ केव्हीएचे तीन (०३) रोहित्रे नादुरूस्त झाली होती. सदर नादुरुस्त रोहित्रांवरचा भार इतर रोहित्रांवर टाकून गावातील वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यात आला होता. सदरील तीनही नादुरुस्त रोहित्रे दिनांक १०.०४.२०२२ रोजी रोहित्रांच्या उपलब्धतेनुसार बदलून वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला. नादुरूस्त रोहित्रांवरचा भार इतर रोहित्रांवर टाकून वीज पुरवठा सुरळीत चालू असल्याने स्थानिक ग्राहकांनी आंदोलन केले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि. बीड) तालुक्यातील मांजरा नदीच्या काठावरील सौंदना गावाच्या शिवारात ऊसाला आग लागून झालेले नुकसान

**(१२) ४७६३६ (१४-१०-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) तालुक्यातील मांजरा नदीच्या काठावरील सौंदना गावाच्या शिवारात दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास जवळपास ३०० ते ४०० एकरातील ऊसाला विजेची तार तुटून आग लागल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मांजरा नदीच्या काठावरील गावात तसेच अंबाजोगाई व केज तालुक्यात या वर्षी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचा ऊस गाळपाअभावी वाळून गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणांच्या नुकसानीचे महावितरणकडून तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सौंदना गावाच्या शिवारात दिनांक १६.०३.२०२२ रोजी श्री. रामचंद्र भिसे यांच्या शेतातील लघुदाब वाहिनीच्या तारा

जोराचा वारा व वावटळ मुळे तुटल्याने स्पार्किंग  होऊन पाचटाने पेट घेतल्याने आग लागून त्यांच्या शेतातील व त्यांच्या शेतालगत असलेल्या इतर शेतकऱ्यांच्या ऊसाला आग लागून जळीत दुर्घटना घडली.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक, बीड यांनी दि.२८.०३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालानुसार सदर अपघातास महावितरण कंपनी जबाबदार असल्याने सदर घटनेतील एकूण ३२ शेतकऱ्यांना महावितरणतर्फे दि.१३.०५.२०२२ रोजी वैयक्तीक पत्रव्यवहार करुन नुकसान भरपाई कागदपत्रे उपविभागीय कार्यालयास सादर करण्याचे कळविले होते. त्यांपैकी २९ शेतकऱ्यांनी काही कागदपत्रे उपविभागास सादर केली असून उर्वरित कागदपत्राची पूर्तता करण्याकरीता संबंधित शेतकऱ्यांना महावितरणतर्फे पाठपुरावा चालू आहे. सदर कागदपत्रे प्राप्त होताच महावितरण कंपनीच्या नियमानुसार मंजूरी देऊन नुकसान भरपाई रक्कम अदा करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यात महावितरण आपल्या दारी योजनेअंतर्गत शेतीपंपास दोन/तीन पोल ऊभे करून लाईन ओढून देण्याबाबत

**(१३) ४७६४१ (१६-०८-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात महावितरण कंपनीने आपल्या दारी योजनेंतर्गत शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी दोन/तीन पोल आवश्यक असताना केबलद्वारे जोडणी दिल्याने योग्य दाबाने विद्युत पुरवठा होत नसल्याने शेतकऱ्यांना मोठ्याप्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर योजनेंतर्गत केबल ऐवजी दोन/तीन पोल उभे करून लाईन ओढुन दिल्यास शेतकऱ्यांना योग्य दाबाने विद्युत पुरवठा मिळेल व योजनाही प्रभावी ठरेल. त्यामुळे केबल ऐवजी शेतकऱ्यांना आवश्यक दोन/तीन पोल उभे करून लाईन ओढून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक १५ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने पोल उभे करून लाईन ओढून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) "महावितरण आपल्या दारी" योजनेअंतर्गत बीड जिल्हयामध्ये २३१३ इतक्या ग्राहकांच्या वीज जोडण्या सद्यस्थितीत केबलव्दारे चालू असून सदर ग्राहकांना वीज बिले चालू आहेत. सदर ग्राहकांना लघुदाब वाहिनी, उच्चदाब वाहिनी, रोहित्रे इ. पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत नवीन कृषी ग्राहकांसोबतच यापूर्वी "महावितरण आपल्या दारी" योजनेअंतर्गत वीज जोडणी देण्यात आलेल्या व आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नसलेल्या ग्राहकांना वीज बिलातून परताव्याच्या माध्यमातून आवश्यक पायाभूत सुविधा उभारणीचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. कृषी ग्राहकांना वरील प्रमाणे पायाभूत सुविधा उभारतांना, १.३% सुपरव्हिजन चार्जेस भरुन महावितरणच्या निवड सूचीबध्द (empaneled) कंत्राटदाराकडून परस्पर काम करुन घेता येईल किंवा १००% रक्कम महावितरणला भरणा करुन, महावितरणव्दारे सदर काम करुन घेण्याचा पर्याय देखील उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि. बीड) तालुक्यात १३२/३३ व २२०/३३ केंद्रावरून ३३ केव्ही उपकेंद्रासाठी स्वतंत्र लाईन करण्या बाबत

**(१४) ४७६४४ (१४-१०-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज, (जि. बीड) मतदार संघात, कळंब, केज, गिरवली, गवारी (मांजरसुभा), या १३२/३३ व २२०/३३ केंद्रावरून अंबाजोगाई, केज, बीड, तालुक्यातील विविध गावातील ३३ केव्ही उपकेंद्रांना विदयुत पुरवठा करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सर्व ३३ केव्ही उपकेंद्र एकाच तारांवर असल्याने सदर तारांवर बिघाड झाल्यास सर्व ३३ केव्ही उपकेंद्र बंद पडतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील १३२/३३ व २२०/३३ केंद्रावरून प्रत्येक ३३ केव्ही उपकेंद्रासाठी स्वतंत्र लाईन करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक १५ जून २०२२ रोजी वां त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने किती ३३ केव्ही उपकेंद्रासाठी स्वतंत्र लाईन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत केज मतदार संघातील ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांना विविध ३३ के.व्ही. वीज वाहिन्यांव्दारे वीज पुरवठा करण्यात येतो. त्यापैकी फक्त सात ३३ के.व्ही. वाहिन्यांवर तीन किंवा अधिक उपकेंद्रे जोडलेली आहेत. सदर ३३ के.व्ही. वाहिन्यांमध्ये तांत्रिक बिघाड निर्माण झाल्यास संबंधित वाहिनीवर जोडलेल्या ३३/११ के.व्ही. उपकेंद्रातून होणारा विद्युत पुरवठा खंडीत होतो.

(३) हे खरे आहे.

(४) केज मतदार संघातील ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांना सद्यस्थितीत विविध ३३ के.व्ही. वीज वाहिन्यांव्दारे वीज पुरवठा करण्यात येत आहे. त्यापैकी ३३ के.व्ही. युसफवडगाव, होळ, सायगांव, पठाणमांडवा वीज वाहिन्यांवरील वीज भार कमी करण्यासाठी नवीन ३३ के.व्ही. चार जोड वाहिन्या (RDSS) सुधारीत वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. तसेच ३३ के.व्ही. मांजरसुंबा वाहिनी वरील भार कमी करण्यासाठी जिल्हास्तरीय कृषी आकस्मिक निधीतून २२०/३३ के.व्ही. मांजरसुंबा उपकेंद्रामधून निघणाऱ्या ३३ के.व्ही. जेबापिंपरी वाहिनी ते ३३/११ के.व्ही. खडकीघाट उपकेंद्रापर्यंत नवीन जोड वाहिनी उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित ३३ के.व्ही. विडा व येळंबघाट वीज वाहिन्यांचा वीजभार कमी करण्यासाठी नवीन १३२/३३ के.व्ही. ५० एमव्हीए क्षमतेचे अतिउच्चदाब उपकेंद्र सारुळ ता. केज , जि. बीड येथे प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर उपकेंद्रातून दोन नवीन ३३ के.व्ही. वाहिन्यांव्दारे विडा वाहिनीवरील हनुमान पिंपरी व राजेगांव उपकेंद्र तसेच येळंबघाट वीज वाहिनीवरील नांदुरघाट व वाघेबाभळगांव उपकेंद्र अशा प्रत्येकी दोन उपकेंद्राचा भार कमी करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे चारणवाडी, परळी (ता.शहापूर, जि.ठाणे ) येथील गावात विदयुत उपकेंद्र मंजूर करण्याबाबत

**(१५) ४७६६१ (२०-०९-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चारणवाडी, परळी (ता.शहापूर, जि.ठाणे) ही गांवे आदिवासी बहुल असून अतिदुर्गत भागात वसलेले असल्याने येथे विदयुत उपकेंद्र मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास ऊर्जा मंत्री, यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने आदिवासी भागात विदयुत उपकेंद्र उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
मौजे चारणवाडी, परळी ही गावे ता. शहापूर, जि. ठाणे येथे स्थित नसून ता. वाडा, जि. पालघर या भौगोलिक भागात वसलेली आहेत. येथे विद्युत उपकेंद्र मंजूर करण्याबाबत विधानसभा सदस्यांनी तत्कालीन ऊर्जा मंत्री यांना निवेदन सादर केले आहे.
(२) उपरोक्त नमूद केलेल्या भागातील वीज पुरवठा हा २२०/२२ के.व्ही. वाडा अतिउच्चदाब उपकेंद्रामधून निर्गमित होणाऱ्या १२० किमी लांबीच्या २२ के.व्ही परळी फिडरव्दारे होतो. सदर वाहिनीव्दारे एकूण ३४ गावातील ३८५२ ग्राहकांना वीज पुरवठा होत असून सदर फिडरची लांबी जास्त असल्याने काही वेळा वीज पुरवठा करताना तांत्रिक अडचणी निर्माण होतात. सदर समस्येचे निराकरण करणेसाठी नवीन २२/२२ के.व्ही. स्विचिंग स्टेशन MIDC System Strengthening या योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर स्विचिंग स्टेशन करीता लोड सेंटरला योग्य जागा उपलब्ध करुन घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. स्विचिंग स्टेशनचे काम पूर्ण झाल्यानंतर उपरोक्त २२ के.व्ही. परळी फिडर चार भागात विभाजित होऊन सर्व वीज ग्राहकांना योग्य दाबाने गुणवत्तापूर्वक वीज पुरवठा करणे शक्य होईल. जागेच्या उपलब्धतेनुसार व निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आसेगाव (ता.मंगरुळपीर, जि.वाशीम) येथे सुरु असलेल्या अवैध कामाबाबत**

**(१६) ४७६९७ (३०-१०-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आसेगाव (ता.मंगरुळपीर, जि.वाशीम) येथे मोठ्या प्रमाणात सुरु असलेली अवैध कामे सुरु ठेवण्याकरिता पोलिसांनी दहा हजार रुपयांची लाच मागितल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक १६ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास चार पोलिसांवर कारवाई केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्याप्रमाणे वाशिम जिल्ह्यामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात अवैध कामे सुरु असल्याची तक्रार नागरिकांनी संबंधीत विभाग व प्रशासनाकडे व स्थानिक लोकप्रतिनिधींकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अवैध गैरकारभारांमुळे दोन युवकांना प्राण गमवावे लागल्याची घटना माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले, त्यामुळे सुरु असलेले गुटखा व अवैध कारभार बंद करण्यासाठी पोलीस प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर गुन्ह्यांत पकडण्यात आलेल्या आरोपींवर कोणकोणते कलम लावण्यात आले तसेच त्यांच्यावरील गुन्ह्यांची दखल घेत त्यांच्या तडीपारीचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०२३) :** (१) व (२)
सदर प्रकरणात चार पोलीस कर्मचारी यांच्याविरुद्ध वाशिम आसेगाव पोलीस ठाणे, जिल्हा-वाशिम येथे गुन्हा क्रमांक १८३/२०२२ भ्रष्ट्राचार प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम ७,१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयामधील आलोसे यांना अटक करण्यात आलेली आहे. या गुन्ह्याचा तपास सुरु आहे. तसेच पोलीस विभागाकडे प्रशासनाकडून व लोकप्रतिनिधीकडून तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची तात्काळ दखल घेवून योग्य ती कार्यवाही करण्यात येते.
(३) हे खरे नाही.

i. वाशिम घटकात जुगार, दारुबंदी, वाळूचोरी, गुटखा अशा प्रकारचे अवैध धंदे सुरु नसुन, याबाबत माहिती मिळताच वेळोवेळी उचित कारवाई करण्यात येते. वाशिम जिल्ह्यामध्ये सुरु असलेले गुटखा व अवैध कारभार बंद करण्यासाठी तसेच भ्रष्टाचारास प्रतिबंध करण्यासाठी जनजागृती करण्यात येते. भ्रष्टाचारासंबंधी तक्रार करण्यासाठी १०६४ टोल फ्री दुरध्वनी कमांक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून उपलब्ध करण्यात आलेला आहे.
ii. सन २०२२ मध्ये १२३ दारु व्यावसायिक विक्रेत्यावर महाराष्ट्र दारुबंदी कायदा, कलम ९३(ब) अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.
iii. अवैध धंदया बाबत गोपनिय माहितीच्या आधारे वेळोवेळी गुणवत्तापूर्वक छापा टाकून (Quality Raid) अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४)
I. गुटख्यांच्या केसेसमध्ये आरोपीवर भा.दं.वि चे १८८, २७२, २७३, ३२८ कलम लावण्यात आले असून त्यासोबत अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६ अन्वये कलम लावण्यात येतात. तसेच दारुबंदी केसेस मध्ये ६५ ई, ६८ प्रमाणे तसेच जुगार केसेसमध्ये जुगार कायद्याचे कलम कलम ४, ५ व १२(अ) लावण्यात आले आहेत.
II. वाशिम घटकातील वारंवार गुन्हे करणाऱ्या आरोपीची यादी तयार केली असुन जुगार कायद्याअंतर्गत शिक्षा झालेल्या आरोपीवर महाराष्ट्र पोलीस कायदा, कलम ५७ अन्वये एकुण ५७ प्रस्ताव प्रस्तावीत असुन १४ प्रस्ताव दाखल केले आहेत.
III. तसेच सन २०२२ मध्ये MPDA ॲक्ट नुसार चार इसमांना स्थानबध्द केले असून त्यापैकी ०२ Bootlegger यांना स्थानबध्द केले आहे. सध्या दोन्ही आरोपी तुरुंगात आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य वीज वितरण कंपनीने खाजगी जागाचा वीज यंत्रणांसाठी वापर केल्यास त्या जागेचे संबधितांना भाडे देण्याची तरतूद केल्याबाबत**

**(१७) ४७७१५ (२०-०९-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य वीज वितरण कंपनीने खाजगी जागाचा वीज यंत्रणांसाठी वापर केल्यास त्या जागेचे संबधितांना भाडे देण्याची तरतूद असतांना अनेक अधिकारी अनभिज्ञ असल्याने यांची अंमलबजावणी आजअखेर झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने नेमलेल्या वीज नियामक आयोगाच्या '' सप्लाय कोड २००५ '' च्या पाचव्या प्रकरणात याबाबतचा स्पष्ट उल्लेख आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या तरतूदीनुसार खाजगी जागामालकांनी गेल्या अनेक वर्षापासूनचे भाडे व्याजासह देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला व त्याचे स्वरुप काय आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
महावितरण कंपनीच्या पायाभूत सुविधा उभारण्यासंदर्भात दि.२०.१२.२०१८ रोजीच्या परिपत्रकामधील मार्गदर्शक तत्वानुसार डेव्हलपर/बिल्डर/अर्जदार यांना वीजपुरवठा/वीज जोडणी हवी असल्यास त्यांनी वितरण यंत्रणा उभी करण्यासाठी आवश्यक जागा उपकेंद्र/रोहित्र उभारणीसाठी ९९ वर्षाकरिता रु.१/- प्रतिवर्षी याप्रमाणे भाडेपट्टीने महावितरण कंपनीस देण्याची तरतूद आहे, त्यानुसार ९९ वर्षाचे भाडे देऊन अर्जदारांशी करार करुन अंमलबजावणी करण्यात येते.
(२) हे खरे आहे.
मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या "विद्युत पुरवठा संहिता २००५" मधील कलम ५.५ मध्ये याबाबतचा उल्लेख

आहे. सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या २०२१ च्या “विद्युत पुरवठा संहिता २०२१” मधील कलम ६.५ अनुसार अर्जदाराने वितरण रोहित्र उभारणीसाठी योग्य जागा किंवा खोली वार्षिक एक रुपयाच्या भाडेपट्टीने महावितरण कंपनीस उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देशित केले आहे.
(३) विविध कारणामुळे प्रलंबित असलेल्या जागा मालकांकडून याबाबतची मागणी केल्यास “विद्युत पुरवठा संहिता-२०२१” मधील तरतूदीनुसार योग्य ते भाडे देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खानापूर ( जि.सांगली ) तालुक्यातील उमरकांचन (कार्वे), मेंढ (कळंबी) व उमरकांचन (माहुली) या गावांच्या पुनर्वसनाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१८) ४७७३९ (१०-११-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरकांचन (कार्वे), मेंढ (कळंबी) व उमरकांचन (माहुली) (ता.खानापूर, जि.सांगली) या गावांच्या पुनर्वसनाचे काम गेल्या अनेक वर्षापासून अपूर्ण असून गावठाणाअंतर्गत नागरी सुविधा नसल्याने नागरिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील पुनर्वसन गावांतील नागरी सुविधांची कामे अपूर्ण असल्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या गावाचे पुनर्वसन तसेच गावांना नागरी सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) नाही. उमरकांचन (कार्वे), मेंढ ( कळंबी ) व उमरकांचन (माहुली) (ता. खानापूर जि. सांगली) या गावांच्या पुनर्वसन अंतर्गत जलसंपदा विभागाकडून पुरविण्यात येणा-या सर्व नागरी सुविधांची कामे पुर्ण करुन जिल्हाधिकारी सागंली यांचे दिनांक १७/१२/२०१८ अन्वये जिल्हापरिषद, सांगली यांना पुढील कार्यवाहीस्तव हस्तांतरीत करण्यात आली आहेत.
(२) प्रश्न उदभवत नाही
(३) प्रश्न उदभत नाही.
(४) पुनर्वसन कायदयांतर्गत नागरी सुविधेतंर्गत देय असलेल्या १८ नागरी सुविधांपैकी १० नागरी सुविधा जलसंपदा विभागाच्या बांधकाम कक्षाकडून पुरविण्यात येतात. त्यापैकी शेती पोहोच रस्ता, ही नागरी सुविधा सोडून उर्वरित ९ (पाणीपुरवठा, रस्ते, गटार, विद्युत पुरवठा, शाळा, शौचकूप, स्मशानभूमी, ग्रामपंचायत कार्यालय व समाजमंदिर, बसथांबा आणि गुरांसाठी पाण्याचा हौद) इ. नागरी सुविधा उमरकांचन (कार्वे) ,मेंढ ( कळंबी ) व उमरकांचन (माहुली ) (ता. खानापूर जि. सांगली या तीनही गावठाणामध्ये पुर्ण करण्यात आल्या असून ही सर्व कामे जिल्हाधिकारी सागंली यांचे दिनांक १७/१२/२०१८ अन्वये जिल्हापरिषद, सांगली यांना पुढील कार्यवाहीस्तव हस्तांतरीत करण्यात आली आहेत.

---

**मलकापूर (जि.बलडाणा) महसूल विभागा अंतर्गत कास्तकारांना कृषीपंपाकरीता विज जोडणीदेण्याबाबत**

**(१९) ४७७५७ (१४-१०-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरा,मलकापूर,मोताळा,जळगाव जामोद (जि.बुलडाणा) तालुक्यामध्ये माहे एप्रिल, २०१८ पासुन माहे, फेब्रुवारी २०२२ पर्यंत कृषीपंपाच्या जोडणीकरीता पैसे भरलेल्या शेतकऱ्यांना प्रलंबीत कृषीपंप विज जोडणी लवकरात लवकर देण्याचे नियोजन असुनसुध्दा अद्यापपर्यंत कृषीपंप वीज जोडणी दिले नसल्याचे माहे, मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषीपंप विज जोडणीचे काम लवकरात लवकर पुर्ण करण्याबाबत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० नुसार माहे जून २०२२ अखेर कृषी आकस्मिक निधीमधून ६५८ वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत व उर्वरित पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित असलेल्या १५२२ अर्जदारांना कृषी आकस्मिक निधीमधून, राज्य शासनाव्दारे दरवर्षी प्राप्त होणारा निधी, जिल्हा नियोजन समिती निधीच्या उपलब्धतेनुसार वीज जोडण्या देण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यात तसेच गावठाण क्षेत्रात शेतीपंपाच्या वीज वाहक तारांच्या पोलची दुरवस्था झाल्याबाबत

**(२०) ४७८१९ (२०-०९-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यात तसेच गावठाण क्षेत्रात शेतीपंपाच्या वीज वाहक तारांच्या पोलची दुरवस्था होऊन विद्युत तारांचा झोल निर्माण झाल्यामुळे नागरिकांच्या घराच्या भिंतीला विद्युत तारा चीटकल्या आहेत, त्यामुळे सदरहू ठिकाणी संभाव्य धोका टाळण्यासाठी सदरील दुरुस्तीची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याबाबत माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान तहसील कार्यालय औसा येथे झालेल्या आढावा बैठकीत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, महावितरण विभाग, निलंगा यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औसा व निलंगा तालुक्यातील सदर कामांच्या दुरुस्तीसाठी निधी मंजूर करुन दुरुस्तीची कामे तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) महावितरणव्दारे औसा व निलंगा तालुक्यातील ७८४ अपघात प्रवण स्थळांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन त्या ठिकाणची विविध देखभाल दुरुस्तींची कामे करण्यात आलेली आहेत. सदरील कामांसाठी रु.४९.५९ लाख इतका खर्च करण्यात आलेला आहे. त्यामध्ये २९३ उच्चदाब/लघुदाब वाहिनीच्य तारांचा झोळ काढणे तसेच झुकलेले पोल सरळ करणे, १६५ मोडलेले पोल बदलणे, ३१ उपकेंद्रातील दुरुस्तींची कामे करणे, २० ए.बी. स्विच दुरुस्ती करणे व बदलणे, ७२ किटकॅट जळालेली केबल, लग्स बदलणे, १९ रोहीत्रांचे अर्थिंग बदलणे इ. कामांचा समावेश आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हा निर्मितीपूर्वीच्या अधिकृत जातीच्या दाखल्यावरील ठाणे जिल्ह्याची नोंद बदलून नवीन जातीचा दाखला सादर करण्याची जाचक अट रद्द करण्याबाबत

**(२१) ४७८६१ (०६-१०-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील जात पडताळणी कार्यालयाने पालघर जिल्हा निर्मिती पूर्वीच्या अधिकृत जातीच्या दाखल्यावरील ठाणे जिल्ह्याची नोंद बदलून नवीन जातीचा दाखला सादर करण्याची जाचक अट पालघर जात पडताळणी कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी घातली असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जात पडजाळणीच्या जाचक अटीमुळे पालघर जिल्ह्यातील आदिवासी पालक, विद्यार्थी व स्थानिक नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जात पडताळणी कार्यालयाने पालघर जिल्हा निर्मिती पूर्वीच्या दाखल्यांवर ठाणे जिल्ह्याची नोंद पुसल्यास तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने ही अट प्रशासनाने कोणत्या नियमाच्या अधिन राहून घातली आहे याबाबत चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने पालघर जिल्हयातील रहिवासी, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी जाचक अट रद्द करुन नवीन जातीचा दाखला त्वरीत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) असल्यास, जुन्या जातीच्या दाखल्यावर ठाणे जिल्ह्याची नोंद न बदलताच पालघर जिल्ह्यात जात पडताळणी कार्यालय सुरु झाल्यापासून देण्यात येणाऱ्या नवीन दाखल्यावर पालघर जिल्ह्याची नोंद करण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (२३-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही
(३) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे कामकाज आदि "प्रमाण" प्रणाली या ऑनलाईन प्रणालीव्दारे चालते. त्यानुसार ऑनलाईन पध्दतीने जातपडताळणी कार्यवाही केली जाते. सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये जातपडताळणी कामी प्रस्ताव सादर करतेवेळी जात प्रमाणपत्रातील जिल्हयाच्या नावाच्या नोंदी प्रमाणे ठाणे जिल्हयाची नोंद केली असता अशा प्रकरणी ऑनलाईन प्रणालीव्दारे पडताळणी करण्याबाबत तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. सदर तांत्रिक अडचण समिती स्तरावर दुरुस्त करण्यात आलेली आहे. आता अर्जदारांना ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी ऑनलाईन प्रणालीमध्ये ठाणे ऐवजी पालघर अशी नोंद करुन समितीकडे अर्ज सादर करता येतात.
(४) समिती स्तरावरुन निर्गमित करण्यात येणाऱ्या जात वैधता प्रमाणपत्रावर जिल्हयाची नोंद पालघर अशी नोंदविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**रावेर (जि. जळगांव) येथे रेशनच्या धान्याचा काळा बाजार होत असल्याबाबत**

**(२२) ४७८८६ (२३-०९-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर (जि. जळगांव) शहरातील ब-हाणपूर रोडस्थित एका धान्य व्यापारी वाहनातून रेशनचे धान्य काळयाबाजारात विक्रीसाठी नेत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धान्याचे नमूने तपासणीसाठी पाठवून संबंधित व्यापारी पुनमचंद भिकूचंद अग्रवाल यांचे गोडाऊन सील करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वाहनावर देखरेख व तपासणीसाठी ठेवण्यात आलेला पोलीस बंदोबस्त शिथिल करण्यात आला असल्याने स्थानिक पोलीस, महसूल अधिकारी व संबंधित व्यापारी यांच्या संगनमताने आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :**(१), (२) व (३)
दिनांक १५.०३.२०२२ रोजी रावेर शहरातील बऱ्हाणपूर रोडवरील श्री. पुनमचंद भिकूचंद अग्रवाल या व्यापाऱ्याच्या गोडाऊन समोर गहू धान्याने भरलेले वाहन आढळून आले. त्यानुसार, गोडाऊन सील करण्यात आले होते तथापि, सदर गोडाऊन मध्ये इतर धान्य व त्यावर प्रक्रिया करण्याचे काम चालत असल्याने ते धान्य खराब होऊ नये याकरीता गोडाऊन मालक यांच्याकडून लेखी हमी पत्र घेऊन गोडाऊनचे सील व पोलीस बंदोबस्त काढण्यात आला होता.

(४) प्रकरणी तहसिलदार, रावेर यांनी दिनांक २१.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राथमिकदृष्ट्या गोदामांमधील सील करण्यात आलेले धान्य हे सार्वजनिक वितरण प्रणालीतील नसल्याचा अहवाल सादर केला असल्याने श्री.अग्रवाल यांच्या विनंती नुसार सदर धान्यसाठा दिनांक ४.११.२०२२ रोजी त्यांच्या ताब्यात देण्यात आला आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

### कल्याण (जि.ठाणे) येथील शहरांमध्ये गुन्हेगारीच्या प्रवृत्तीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(२३) ४७९९५ (२८-१०-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) येथील शहरामध्ये मागील दोन महिन्यापासून अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरु असून गुन्हेगारी प्रवृत्तीत तसेच अवैध दारु विक्री, देहविक्री व अंमली पदार्थ विक्री यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिनांक १ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,
(३) असल्यास, याबाबत शहरातील वाढलेल्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :**(१) ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये जुगार, देहविक्री, अंमली पदार्थ सेवन, गुटखा व अवैध दारु या गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली आहे. तथापि अंमली पदार्थ विक्री व इतर गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ झालेली नाही.
(२) ठाणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये कल्याण हद्दीत अवैध धंद्याविरुध्द गुन्हे दाखल करून आरोपींना अटक करून त्यांचे विरुध्द मा. न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात येते.
(३) शहरातील अवैध धंद्याबाबत वाढलेल्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना खालीलप्रमाणे:-
१) अवैध धंदयाविरुध्द कारवाई करण्याकरिता दर महिन्याला ऑल आउट ऑपरेशन व विशेष मोहिमा राबवून जास्तीत जास्त कारवाई करण्यात येतात.
२) ज्या आरोपींचा जामीन मंजूर होतो त्यांच्याविरुध्द म.पो.का. किंवा सी.आर.पी.सी कलमान्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात येते.
३) अटक करण्यात आलेल्या आरोपींविरुद्ध जास्तीत जास्त पुरावे गोळा करून विहित वेळेत मा. न्यायालयात दोषारोप पाठविणेबाबत दक्षता घेण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) येथील महानगरपालिकेतील दिव्यांग पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत निधीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२४) ४८००३ (३०-१०-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील सन २०१७-१८ ते २०१८-१९ या कालावधीत दिव्यांग पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत निधीत गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांच्याकडे शंकर साळवे यांनी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानंतर पालिकेचे तत्कालीन आयुक्त, दोन तत्कालीन उपायुक्त, समाज विकास अधिकारी, एक लिपिक तसेच तत्कालीन महापौर यांच्याविरोधात कार्यवाहीसाठी महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी व

राज्याच्या नगरविकास सचिवांकडे ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने परवानगी मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत साधारण साडेतीन ते चार वर्षापूर्वी दिव्यांग पुनर्वसन कार्यक्रमाअंतर्गत निधी वाटपात गैरव्यवहार झाल्याची तक्रार शंकर साळवे यांनी ठाण्यातील आर्थिक गुन्हे शाखेकडे केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत माहे फेब्रुवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान गुन्हे शाखेने ही तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे वर्ग केला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी तक्रारी अर्जातील आक्षेप प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने साळवे यांचा तक्रारअर्ज पुढील कार्यवाहीसाठी व चौकशी व आदेश प्राप्त होण्याकरीता दिनांक ७ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) होय, हे खरे आहे.

I. श्री.शंकर साळवे यांनी दिव्यांग कल्याण व पुनर्वसन योजनेंतर्गत २०१७-१८ ते २०१८-१९ मध्ये कल्याण डोबिंवली महानगरपालिकेमध्ये रुपये ४,०२,१२,५०४/- इतक्या रकमेचे वाटप व अनुदान कर्ज यामध्ये भ्रष्टाचार आणि अनियमितता, गैरकारभार झाल्याबाबतचा तक्रार अर्ज अपर पोलीस महासंचालक, आर्थिक गुन्हे शाखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे केला होता. त्यानंतर सदर अर्ज पुढील कार्यवाहीसाठी आर्थिक गुन्हे शाखेकडून सदर अर्ज लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांच्याकडे दिनांक ०२.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे.

II. सदर अर्जातील आक्षेप हे नगरविकास विभागाशी संबंधित असल्याने प्राप्त अर्ज व सहपत्रे उचित कारवाईकरिता तसेच तक्रार अर्जातील आक्षेपांमध्ये भ्रष्टाचाराशी संबंधीत मुद्दे उपस्थित होत असल्यास भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १७ (अ) प्रमाणे सदर प्रकरणी चौकशी/तपास करण्याकरीता विहीत कालमर्यादेत लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राधिकृत करणेसाठी सदरचा तक्रार अर्ज नगरविकास विभागाकडे दिनांक ०४.०७.२०२२ च्या पत्रान्वये आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आर्वी विधानसभा मतदार संघातील आर्वी व आष्टी (जि.वर्धा) तालुक्यातील अप्पर वर्धा प्रकल्पाचे मायनर व सबमायनर चे रस्ते अत्यंत खराब झाल्याबाबत

**(२५) ४८१४७ (१०-११-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)आर्वी विधानसभा मतदार संघातील आर्वी व आष्टी (जि.वर्धा) तालुक्यातील अप्पर वर्धा प्रकल्पाचे कॅनलद्वारे शेतकऱ्यांना सिचंनाकरिता पाणी देण्यात येत असून त्यावरील मायनर व सबमायनर वरील शेतकऱ्यांना दळण-वळण करण्यात येत (वाहिपरी) असलेल्या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी कॅनल तयार झाल्यापासून उक्त रस्त्यांची कोणतीच दुरूस्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले असल्याने शेतकऱ्यांना आपल्या शेतातील दळण-वळणास (वाहिपरी) ये-जा करणे अशक्य झाले असल्याने, सदर रस्ते दुरूस्त करण्याबाबत शेतकरी वारंवार मागणी करित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त रस्त्यावर मुरमाची भरती करून शेतकऱ्यांच्या सोईसाठी तातडीने रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
अप्पर वर्धा प्रकल्पाचे कालव्याच्या मायनर व सबमायनर वरील रस्ते काही ठिकाणी नादुरुस्त अवस्थेत आहेत. सदर रस्ते यांत्रिकी विभागाकडुन पाखरण अंतर्गत दुरुस्त करण्यात येत आहेत. कालव्याच्या मायनर व सबमायनर वरील रस्ते शेतकऱ्यांकरिता खाजगी दळणवळणाचे रस्ते नाहीत. तथापि शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०९९/(२७३/९९)/सिं व्य.(धो) दिनांक ४ जुन २००३ अन्वये कालवा,वितरिका वरिल सेवापथ वापरण्याबाबत कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असुन या प्रकरणी शेतकऱ्यांनी दळणवळण (वाहिपेरी )करण्यात अथवा सेवापथ वापरण्याबाबत नियमाप्रमाणे परवानगी मागितलेली नाही.
(२) हे खरे नाही.
यांत्रिकी विभागाकडुन प्रत्येक वर्षी आवश्यकतेप्रमाणे अथवा जास्त खराब झालेले कालव्याचे निरिक्षण पथ व सेवापथ दुरुस्त करण्यात येतात.
(३) हे खरे आहे.
सदर रस्ते दुरुस्त करण्याबाबत शेतकऱ्यांची मागणी होत आहे. तथापी शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०९९/(२७३/९९)/सिं व्य.(धो) दिनांक ४ जुन २००३ नुसार लाभधारकांनी सेवापथाचा वापर करण्याकरीता सेवाशुल्क शासनास प्रदान करुन कार्यकारी अभियंता यांचेकडून रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे. आर्वी व आष्टी तालुक्यातील लाभधारकांनी नियमानुसार सेवापथ वापरण्याबाबत परवानगी मागीतलेली नाही. त्यामुळे कोणत्याही लाभधारकाला या शासन निर्णयानुसार सेवापथ वापरण्याची परवानगी अद्याप देण्यात आलेली नाही.
(४) शासनाच्या यांत्रिकी विभागाकडील मशिनरीचा वापर करुन कालव्याचे व त्यावरील मायनर,सबमायनर वरील निरिक्षण पथ व सेवापथावरील भरावाच्या काम करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सरकारी कोट्यातील घर स्वस्तात देण्याचे आश्वासन देऊन ठाण्यातील एका ज्येष्ठ महिलेची फसवणूक केल्याबाबत

**(२६) ४८१६५ (२८-१०-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरकारी कोट्यातील घर स्वस्तात देण्याचे आश्वासन देऊन ठाण्यातील एका ज्येष्ठ महिलेची सुमारे एक कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी ठाणे शहरातील चितळसर पोलिस स्थानकांत पाच जणांविरुध्द दिनांक १७ व १८ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाचा तपास करण्यात आला आहे काय, तपासानुसार आरोपीकडून किती रक्कम वसूल केली तसेच त्यांच्यावर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) होय. सरकारी कोट्यातील घरे स्वस्तात देतो, असे सांगून आर्थिक फसवणूक केल्याबाबत दि. १४/०६/२०२२ रोजी एका ज्येष्ठ महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार चितळसर पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गु.र.क्र. १४२/२०२२, भा. दं. वि. कलम ४०६, ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ अन्वये चार आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) सदर प्रकरणी एका आरोपीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रूपये १० लक्ष जमा केले असून सदर गुन्हा तपासाधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यात महावितरण कंपनी च्या सक्तीच्या वीज वसुली बाबत..**

**(२७) ४८१९० (१४-१०-२०२२). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना येथील शहरी व ग्रामीण भागातील सर्वत्र महावितरण वीज वितरण कंपनीकडून वीज देयकाची सक्तीने वसुली सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या दोन महिन्यात जालना जिल्ह्यातील तात्पुरत्या सुमारे २१२३ व कायमस्वरूपी सुमारे ३१२१ वीज जोडण्या तोडण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, वीज वितरण कंपनीने कर्मचाऱ्यांना ग्राहकांकडून सक्तीने वीज देयक वसुली न केल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचा इशारा दिलेला आहे, तसेच जालना ग्रामीण उप कार्यकारी अभियंता यांना निलंबित केले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सक्तीने करण्यात येत असलेली वीज देयक वसुली थांबविण्याबाबत तसेच वीज वितरण कर्मचाऱ्यांना कारवाई पासून दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

वीज देयक भरण्याकरिता विद्युत अधिनियम २००३ मधील तरतूदीप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

(२) हे अंशत: खरे आहे.

सप्टेंबर-२०२२ व ऑक्टोबर-२०२२ या महिन्यात जालना जिल्हयात वीज बिल भरणा न केल्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात १९६७ ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला व २२६६ ग्राहकांचा कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.

(३) जे ग्राहक विहीत मुदतीत देयकाचा भरणा करीत नाहीत अशा थकबाकीदार ग्राहकांकडे विविध मार्गाने पाठपुरावा करण्यात येतो. महावितरणचे जालना ग्रामीण उपविभागाचे कार्यकारी अभियंता यांना त्याच्या जबाबदाऱ्यांच्या अनुषंगाने कामे न केल्याच्या विविध कारणास्तव फेब्रुवारी २०२२ मध्ये निलंबित करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरा-भाईंदरचे माजी आमदार यांच्या पत्नीविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केल्याबाबत**

**(२८) ४८२९७ (०१-११-२०२२). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदरचे माजी आमदार यांच्या पत्नीविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कोट्यवधी रुपयांची बेहीशोबी मालमत्ता गैरमार्गाने जमवल्याच्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या झडतीत किती चल व अचल संपत्ती निदर्शनास आली आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी पूर्ण करुन आतापर्यंत कोणती कारवाई केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०२३) :** (१) होय, खरे आहे.

मिरा-भाईंदरचे माजी आमदार यांच्या पत्नी विरुध्द नवघर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद ३८७/२०२२, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १३(२) सह १३(१) (इ) सह भा.दं.संहिता कलम १०९ प्रमाणे दि.१९/०५/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे

(२) आरोपी लोकसेवक यांच्या मिरा-भाईंदर रोड, मिरारोड पूर्व येथे राहते घराचे घरझडतीमध्ये ६८,३९,७९९/ रुपयाची

मालमत्ता आढळून आलेली आहे. तसेच त्यांच्याकडे एकूण ३,७५,७५,०००/- रुपये किंमतीचे वाहने आढळून आली आहेत. त्यांच्याकडे १५१३ ग्रॅम सोने व डायमंडचे २४ दागिने मिळून आलेले असून त्यांची किंमत १,१०,४१,१००/- इतकी आहे. तसेच रुपये २५,६००/- रोख रक्कम आढळून आलेली आहे.

लोकसेवक यांच्या मिरारोड पूर्व येथील कार्यालयाची झडती घेतलेली असून सदर झडती दरम्यान ३९,५५,१७१/ रुपयांची मालमत्ता आढळून आलेली आहे. कार्यालयीन झडतीमध्ये ७,८५,८७१/- रुपये रोख रक्कम आढळून आलेली आहे.

(३) मिरा-भाईदंरचे माजी आमदार यांच्या पत्नी विरुध्द नवघर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद ३८७/२०२२, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १३(२) सह १३(१) (इ) सह भा.दं.संहिता कलम १०९ प्रमाणे दि.१९/०५/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयात आरोपी लोकसेवक व त्यांची पत्नी यांनी अटकपूर्व जामीनाकरीता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अर्ज केलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आर्वी, (ता. आर्वी, जि. वर्धा) येथील विद्युत वाहिनी भूमीगत करण्याबाबत

**(२९) ४८३०८ (२०-०९-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर परिषद आर्वी, (ता. आर्वी, जि. वर्धा) येथील संपुर्ण शहरातील विदयुत वाहिन्या भुमीगत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनीधी यांनी दिनांक ७ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, शहरात अनेक वर्षापासून विदयुत वाहिन्या इलेक्ट्रीक पोल द्वारे टाकण्यात आलेले असून अनेक ठिकाणी घरावरून, प्लॉटवरून टाकण्यात आलेल्या असल्याने जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील संपूर्ण विदयुत वाहिन्या भुमीगत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ज्या ठिकाणी घरावरुन, प्लॉटवरुन जाणाऱ्या विद्युत वाहिन्या असल्याने जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता आहे त्या काही ठिकाणच्या विद्युत वाहिन्या स्थलांतरणाची एकूण रु. ९१.५५ लाखांची ५९ कामे सन २०१९ ते २०२२ मध्ये जिल्हा नियोजन समितीमार्फत (डीपीडीसी योजनाअंतर्गत) करण्यात आली आहेत व रु.३७.९७ लाखांची एकूण २२ कामे सन २०२२-२३ करिता जिल्हा नियोजन समिती, वर्धा यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धेकरीता सादर करण्यात आली आहेत. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध झाल्यानंतर प्रस्तावित कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

तसेच आर्वी ते तळेगाव राष्ट्रीय महामार्ग आर्वी शहरातून जात असल्यामुळे सदर महामार्गावरील विद्युत वाहिन्या भुमिगत करण्याचे काम प्रस्तावित आहे. यामध्ये नगरपरिषद, आर्वी येथे उच्चदाब वाहिनी ५ कि.मी. व लघुदाब वाहिनी ४ कि.मी. ची कामे समाविष्ट आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक मंजुर असून अंदाजपत्रकानुसार कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रगतीपथावर आहे.

जिल्हा नियोजन समितीमार्फत (डी.पी. डि.सी.) व इतर योजनेमध्ये अंतर्भूत भुमीगत वाहिन्या व्यतिरीक्त आर्वी शहरातील उर्वरीत वाहिन्या भूमिगत करण्यासंदर्भात सविस्तर प्रकल्प अहवाल ज्यामध्ये उच्चदाब वाहिनी ४४ कि.मी. व लघुदाब वाहिनी २८५ कि.मी. भूमीगत करण्याचे अंदाजपत्रक तयार करुन जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर प्रस्तावित कामे प्राधान्याने पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी गडचिरोली विभागात बंद पडलेल्या मीटरचे देयक ग्राहकांना दिल्याबाबत**

**(३०) ४८३११ (१४-१०-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गडचिरोली विभागात विजय बाबुराव बाल्स्मवार या सामान्य घरगुती वीज ग्राहकाला २०१९ पासून बंद पडलेल्या मीटरचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये ६१ हजार रुपयांचे वीज देयक देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वीज ग्राहकाने दि.२२ जुलै २०१९ रोजी वीज मिटर बंद असल्याने तो बदलून देण्यात यावे अशी अधिकृत तक्रार विदयुत कंपनीच्या ऑनलाईन प्रणालीवर केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीची दखल न घेता ५०० ते ६०० रुपये नेहमी वीज देयक येणाऱ्या या वीज ग्राहकाला ८५ युनिटचे अतिरिक्त देयक २ वर्षापासून नियमित भरूनही माहे नोव्हेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान ६१ हजार रुपयांचे वीज देयक त्याना देण्यात आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले त्याअनुषंगाने वीज देयक देण्याऱ्या संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) या प्रकरणी मीटर वाचन करणारे कंत्राटदारास दि.१२.०५.२०२२ च्या पत्रानुसार बडतर्फ करण्यात आले आहे. तसेच दोषी कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

श्री. बाबुराव बाल्स्मवार, रा. लांझेडा, गडचिरोली या घरगुती ग्राहकाला माहे सप्टेंबर २०१८ ते माहे सप्टेंबर २०२१ पर्यंत नादुरुस्त मिटरचे सरासरी नुसार ८५ युनिटचे वीज देयक देण्यात आलेले होते. सदर ग्राहकांचे माहे सप्टेंबर २०१९ ते सप्टेंबर २०२१ पर्यंत चे सरासरी युनिट वजा करुन मीटर रिडींग नुसार सुधारित वीज देयक देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील प्रलंबित कृषी पंपाची वीज जोडणी देण्याबाबत**

**(३१) ४८५४४ (१४-१०-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयामध्ये सन २०१८-१९ पासून माहे जानेवारी, २०२२ पर्यंत कृषीपंप वीज जोडणीसाठी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ४,१३८ कृषीपंप अर्जदारापैकी १,३७४ अर्जदारांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित २,७६४ अर्जदारांना कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत वीज जोडणी अनुज्ञेयतेनुसार २५०० अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे तर २६४ अर्जदारांना सौर कृषी पंपाव्दारे वीज जोडण्या देण्याचे नियोजित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गत ३-४ वर्षापासून कृषी पंपासाठी अर्ज करुन पैसे भरुनही अजूनपर्यंत विद्युत खांब उपलब्ध नसल्याच्या कारणास्तव वीज जोडणी करून देण्यात आलेली, नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात कोणत्याही प्रकारच्या सिंचनाची सुविधा नसल्याने असंख्य शेतकरी या कृषी पंपावर अवलंबून आहेत त्यामुळे वारंवार पाठपुरावा करून वीज जोडणी मिळावी याकरिता शेतकरी आंदोलन करीत आहेत हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना कृषी पंपाला वीज जोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) हे अंशत : खरे आहे.
गडचिरोली जिल्हयामध्ये मार्च २०१८ पासून माहे जानेवारी २०२२ पर्यंत कृषीपंप वीज जोडणीसाठी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ४१३० कृषीपंप अर्जदारांपैकी २०६३ अर्जदारांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.
उर्वरित २०६७ अर्जदारांपैकी कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत १०१९ अर्जदारांना लघुदाब वाहिनीवर व ८०१ अर्जदारांना उच्चदाब वीज वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देण्यात येणार आहे. तसेच २४७ अर्जदारांना सौर ऊर्जेव्दारे वीज पुरवठा करण्याचे नियोजन केलेले आहे.
(३) हे खरे नाही.
गडचिरोली जिल्हयात दिनांक ३१.०३.२०१८ पर्यंत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या सर्व कृषीपंप ग्राहकांना वीज जोडणी देण्यात आली आहे. तसेच, मार्च २०१८ पासून दि. ०३.११.२०२२ पर्यत ५१६८ कृषीपंप ग्राहक नवीन वीज जोडणीकरिता पैसे भरुन प्रलंबित होते. त्यापैकी दि.०३.११.२०२२ अखेर २४७७ कृषीपंप ग्राहकांना वीज जोडणी देण्यात आली आहे व उर्वरित कामे प्रथतीपथावर आहेत.
(४) हे खरे नाही.
(५) गडचिरोली जिल्हयामध्ये दि.३१०३.२०१८ पर्यंत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या सर्व कृषीपंप ग्राहकांना वीज जोडणी देण्यात आली असून एप्रिल २०१८ नंतर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप ग्राहकांना कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२२ नुसार वीज जोडणी देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस स्टेशनात फिर्यादीने नोंद केलेल्या गुन्ह्याचा तपास होत नसल्याबाबत**

**(३२) ४८५४९ (३१-१०-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहाय्यक नगरचनाकार प्रकाश मुरलीधर (मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस स्टेशन मधील गु.क्र.७२/२०१८, कलम ४६५, ४६८, ४७१, ४२०, १२०(ब), ३४ भा.द.वि. सह महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५७ कलम ५९ द्वारे दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास गुन्हा नोंद केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत आरोपीकडून पोलिसांना कोणत्याही प्रकारे सहकार्य केले जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गुन्ह्याचा तपास करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन गृह मंत्री, यांना निवेदन सादर केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२३) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) होय.

(४) सदर गुन्हयाचा तपास करुन आरोपीविरोधात मा.न्यायालयात दि. १८ जुलै, २०२२ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ (८) प्रमाणे या गुन्हयाचा उर्वरीत तपास करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खानापूर, ल.पा.तलाव (ता. जि. उस्मानाबाद) तलावात नैकाविहारासाठी मान्यता मिळणेबाबत

**(३३) ४८७६७ (११-१०-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर, ल.पा.तलाव (ता. जि. उस्मानाबाद) तलावात नौकाविहारासाठी मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव दिनांक ०९ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कार्यकारी अभियंता उस्मानाबाद पाटबंधारे विभाग क्र. १ यांच्यामार्फत दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक लाभक्षेत्र विकास, औरंगाबाद यांच्याकडे नौकाविहारासाठी जाहीर निविदा मागविण्यासाठी मंजुरी मागितली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ०८ डिसेंबर, २००३ च्या शासन परिपत्रकानुसार लघु पाटबंधारे तलावांवर नौका विहाराची परवानगी संबंधित कार्यकारी अभियंतानी अधीक्षक अभियंताच्या मंजुरीने द्यावी असे नमूद करण्यात आल्याचे उक्त प्रचलित शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी असे प्रादेशिक कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उक्त परिपत्रकाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन संबंधित कार्यकारी अभियंता अधीक्षक अभियंता यांना नौवा विहाराची परवनगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडून दि.०४.०७.२०२२ रोजी प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
उस्मानाबाद पाटबंधारे विभाग क्र.१, उस्मानाबाद यांनी दि.११.११.२०२१ अन्वये, खानापूर ल.पा.तलाव, ता.जि.उस्मानाबाद येथे नौका विहारासाठी जाहीर निविदा मागणीसाठी मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर या कार्यालयाकडे सादर केला होता.
(३) शासन परिपत्रक दि.०८.१२.२००३ अन्वये पाटबंधारे विभागाच्या मोठया, मध्यम व लघु प्रकल्पांच्या जलाशयात नौकाविहारास परवानगी देण्याची कार्यपध्दती व दर निश्चित करण्याबाबत विहित करण्यात आल्या आहेत. तथापि, यामध्ये आता काही सुधारणा करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईमध्ये ज्येष्ठ नागरिकाची चोरांकडून फसवणूक होत असल्याबाबत

**(३४) ४८८३८ (३१-१०-२०२२). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या गल्लीत वृध्द मंडळीना लक्ष केले जात असून पुढे नाकाबंदी आहे, आम्ही पोलीस आहोत, देवळात प्रसाद द्यायचा आहे असे सांगून दागिने लुटण्यात येत आहे, उक्त घटना वारंवार घडून मोठ्या प्रमाणात वाढ होऊन वरळी जांभोरी मैदान माहिम, कांदिवली पश्चिम व बोरीवली येथे वृध्द व्यक्तींकडून सोन्याचे दागीने पळविल्याचे दिनांक १५ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणात इराणी टोळ्या सक्रीय झाल्या असून वाकोला, चुनाभट्टी, वांद्रे, पवई, साकीनाका येथे ही विविध कारणे सांगून हात चलाखीने सोन्याचे दागिने पळविले असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात टोळ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी व त्यांचेवर कारवाई करुन शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०१-२०२३) :** (१) दि.१०/०६/२०२२ रोजी बोरिवली, मुंबई येथे दोन अनोळखी इसमांनी वृध्द महिलेला पोलीस असल्याचे सांगून फसवणूक करुन त्यांचे सोन्याचे दागीने चोरी केल्याने अनोळखी इसमांविरूध्द संबंधीत बोरीवली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.८७१/२०२२, भा.द.वि. कलम ४२०, ४१९, १७०, ३४ (सी.सी.टी.एन.एस. क्र.९७६/२२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाअंतर्गत वृध्द नागरिकांचे हात चलाखीने सोन्याचे दागिने पळविल्यासंदर्भात वाकोला पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ४७१/२०२२ व गु.र.क्र. ५८३/२०२२, साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ७७/२०२२ व गु.र.क्र. ११५/२०२२ तसेच पवई पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ७७५/२०२२ असे एकूण पाच गुन्हे दाखल असून त्याचा तपास सुरु आहे.
(३) जेष्ठ नागरीकांची अशा टोळ्यांकडून फसवणूक होऊ नये म्हणून बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून करण्यात आलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे :-
I. अशा टोळयांची वस्ती असलेल्या ठिकाणी कोंबीग ऑपरेशन करुन संशयीत आरोपीतांचा शोध घेऊन अशा आरोपी/ टोळी आढळुन आल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येते.
II. पोलीस ठाणेस कार्यरत असलेली मोबाईल वाहने, बिट मार्शल, साध्यावेशातील अधिकारी/ अंमलदार यांना अशा टोळयांबाबत अवगत करुन त्यांच्यावर लक्ष ठेवण्याबाबत सांगण्यात येते.
III. पोलीस ठाणे हद्दीत केबल धारक यांना यासंदर्भात जनजागृती करण्यासाठी केबलवर जाहिरात देण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.
IV. पोलीस ठाणे हद्दीत फिक्स पॉईट बंदोबस्त लावण्यात आलेला आहे, वेळोवेळी नाकाबंदीचे आयोजन करण्यात येते.
V. नागरीकांमध्ये जनजागृती करुन अशा प्रकारच्या गुन्हयांना प्रतिबंध कसा घालावा याबाबत संवाद साधण्यात येतो.
VI. पोलीस ठाणे हद्दीत मोक्याच्या ठिकाणी फलक व त्यावर ठगांपासून सावधान या आशयाच्या सूचना लावण्यात आलेल्या आहेत.
VII. अशा टोळयांकडून पुन्हा गुन्हा घडू नये म्हणुन त्यांचेवर योग्य ती प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## मौजे गुहार व कावळे (ता. वाडा, जि. पालघर) येथील आश्रमशाळा व वसतीगृहाच्या कामाबाबत

**(३५) ४८८९३ (२१-०९-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गुहार व कावळे (ता. वाडा, जि.पालघर) येथील आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत ४ कोटी ३५ लाख रुपये खर्च करुन आश्रमशाळांच्या नवीन इमारतीचे बांधकाम सन २०१८ मध्ये सुरु करण्यांत आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास गुहार येथील आश्रमशाळा व वसतीगृह इमारतीची कामे मूळ कंत्राटदारांकडून काढून कामातील त्रुटींची जबाबदारी व जोखमीवर दुरुस्ती करण्याबाबतचे नियोजन काय आहे व उर्वरित कामासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबवुन निधीची उपलब्धता करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, गुहार व कावळे येथील आश्रमशाळा इमारत व मुलींचे वसतीगृह बांधकामावर आतापर्यंत किती खर्च झालेला आहे व गुहार येथील शाळा इमारत व वसतीगृहाचे उर्वरित कामावर किती खर्च अपेक्षित आहे व त्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२०-०१-२०२३) :** (१) होय,
(२) होय.
शासकीय आभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीटच्या निष्कर्षास अधीन राहून शाळा इमारतीचे बांधकाम कंत्राटदाराच्या जोखीम व जबाबदारीवर निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
(३) मौ.गुहीर येथील आश्रमशाळा इमारत व मुलींचे वसतिगृह बांधकामावर एकूण ₹३८५.७९ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे. सदर कामाच्या उर्वरीत स्थापत्य कामासाठी मूळ निविदा रकमेनुसार ₹८८.७८ लक्ष + १८% वस्तू व सेवाकर (जीएसटी) एवढा खर्च अपेक्षित आहे. मौ.कावळे येथील आश्रमशाळा इमारत व वसतिगृह बांधकामावर एकूण ₹६००.०० लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे. विभागाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार कावळे, ता.विक्रमगड, जि.पालघर येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळा संकुलात मुलांच्या वसतीगृहाचे उर्वरित बांधकाम करण्यासाठी ₹३५६.५४ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील नीरा देवधर कॅनॉलच्या कामाला मंजूरी देण्याबाबत

**(३६) ४८९०३ (१४-१०-२०२२). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील २२ गावांना जर पाणी द्यायचे ठरविले तर नीरा-देवधर उजवा कॅनॉल वरती धर्मपुरी या ठिकाणी पंप हाऊस बांधून पाणी पाईपलाईनद्वारे अंदाजे ८ ते ९ की.मी. उचलून कोथळे गावांमध्ये सोडल्यास तेथून पुढे कालव्याद्वारे हे पाणी माळशिरस तालुक्यातील कोथळे, कारुंडे, पिंपरी, फडतरी, शिवार-वस्ती, लोंढे मोहिते वाडी, लोणंद, गिरवी, भांब, रेडे, कन्हेर, मानकी, इस्लामपूर, गोरडवाडी, गारवाड, मगरवाडी, पठाण वस्ती, तरंगफळ, सुळेवाडी, शिंगोर्णी, व बचेरी या गावांना या योजनेचा लाभ होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त नीरा देवधर कॅनॉलच्या कामाला तात्काळ मंजूरी तसेच निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही.
निरा उजवा प्रवाही कालवा धर्मपूरी गावाच्या लाभक्षेत्रामधुन आहे. धर्मपूरी गावाच्या वरील तलांकास सुमारे ७ ते ८ कि.मी. अंतरावरुन कारुंडे गावामधून प्रस्तावित निरा देवघर प्रकल्पांतर्गत निरा उजवा प्रवाही कालवा बंदिस्त नलिकेद्वारे जात आहे. माळशिरस तालुक्यातील कारुडे, पिंपरी, लोंढे- मोहितेवाडी, लोणंद, गिरवी, रेडे, कण्हेर, मानकी, इस्लामपूर, गोरडवाडी यांचा समावेश निरा देवघर उजवा कालवा ६६ ते १५८ कि.मी. च्या लाभक्षेत्रात आहे. तथापि कोथळे, फडतरी, भांब, गारवाड, मगरवाडी, पठाणवस्ती, तरंगफळ, सुळेवाडी, शिवारवस्ती, शिंगोर्णी व बचेरी ही गावे निरा देवघर उजवा कालवा ६६ ते १५८ कि.मी. च्या लाभक्षेत्रात येत नाहीत.
(२) निरा देवघर प्रकल्पास रु.९१०.९१ कोटी इतक्या रकमेच्या द्वितीय सुधारीत प्रशासकीय अहवालास महामंडळाने मान्यता प्रदान केली आहे. निरा देवघर प्रकल्पावर सप्टेंबर, २०२२ अखेर ८९२.०६ कोटी इतका खर्च झाला आहे. नीरा देवघर प्रकल्पाचा तृतीय सुप्रमा अहवाल तयार करण्यात आला असून प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दर सूचीनुसार अद्यावत किंमत ३९७६.८३ कोटी इतकी येत आहे. नीरा देवघर प्रकल्पाच्या सुप्रमा अहवालात नीरा उजवा कालवा ६६ ते १५८ कि.मी. या कामाचा समावेश असून सुप्रमा अहवालास मान्यता मिळाल्यानंतर प्रस्तुत काम हाती घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील वाजेवर व वांगणी खोरे या उपसा जलसिंचन योजना प्रकल्पात समाविष्ट करण्याबाबत**

**(३७) ४८९३८ (१२-१०-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील वाजेवर व वांगणी खोरे या उपसा जलसिंचन योजना प्रकल्पात समाविष्ट करुन त्यास उपसा जलसिंचन योजनेद्वारे क्षेत्र ओलिताखाली आणणेबाबत ४० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा मंत्री यांना दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रकरणी ४० कोटी रुपये निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही.

(२) वेल्हे (जि. पुणे) तालुक्यातील वाजेघर, वांगणी खोरे व शिवगंगा खोरे उपसा सिंचन या तीनही उपसा सिंचन योजनांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून संकल्पनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच सदरील उपसा सिंचन योजनांचा समावेश करुन गुंजवणी प्रकल्पाचा तृतीय सुप्रमा अहवाल तयार करण्यात आला असून त्यास मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदरील उपसा सिंचन योजनांचे कामाकरिता निधी मागणीची वार्षिक आखणी कार्यक्रमात तरतूद करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई व केज (जि. बीड) तालुक्यातील मंजूर कामांचा दर्जा तपासून देयके अदा करण्याबाबत**

**(३८) ४८९७१ (१०-११-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई व केज (जि. बीड) तालुक्यातील जिल्हा नियोजन मंडळ (DPDC) मार्फत डोंगरी विकास कार्यक्रमाअंतर्गत सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये करण्यात आलेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याच्या तक्रारी मोठया प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी निकृष्ट कामे करून देयक अदा करण्याचा येत असल्याने सदर कालावधीतील कामांची 'राज्यस्तरीय दक्षता व गुणनियंत्रन पथक, मुंबई' यांच्या मार्फत कामांच्या दर्ज्याची तपासणी व चौकशी करण्यात यावी तसेच सदर कामे अंदाजपत्रकाप्रमाणे चांगल्या दर्ज्याची करून घेण्याबाबत व कामांचा दर्जा तपासूनच देयके अदा करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुखअभियंता, सा.बा. परिमंडळ, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २४ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मंजूर कामांपैकी किती कामांची देयके अदा करण्यात आली तसेच किती कामांचा दर्जा तपासून देयके अदा करण्यात आली आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे,

(२) हे खरे आहे

(३) सन २०१९-२० तीन कामे पूर्ण झालेली असून त्यांची देयके फेब्रुवारी २०२१ मध्ये अदा करण्यात आलेली आहेत.

सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन आर्थिक वर्षात तीन कामांचे देयके अदा करण्यात आलेली आहेत व सदर कामांची दक्षता व गुणनियंत्रक कार्यालयाकडून तपासणी करुन देयके अदा करण्यात आलेली आहेत.
(४) कामे योग्य त्या दर्जाची केली असल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) कामे योग्य त्या दर्जाची केली असल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनाच्या इमारत बांधकामासाठी निधी मंजूर करण्याबाबत

**(३९) ४८९७५ (३०-१०-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पौड पोलिस स्टेशन (मा.मुळशी, जि.पुणे), भोर पोलिस स्टेशन (ता.भोर, जि.पुणे) राजगड पोलीस स्टेशन, नसरापूर (ता.भोर, जि.पुणे) तसेच वेल्हे पोलीस स्टेशन (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील पोलिस स्टेशनसाठी इमारत बांधकाम, अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारतींसाठी जागा उपलब्ध करुन निधी मंजूर होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन गृह मंत्री, यांना दिनांक २४ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनावर शासनाने निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) व (२) होय,
(I) पौंड पोलीस स्टेशन- प्रशासकीय इमारत व पोलीस अधिकारी, अंमलदार यांच्या निवासस्थानांकरीता मौजे दारवली येथील जमीन पोलीस विभागास देण्यासाठी प्रस्ताव महसूल व वन विभागास प्रस्ताव सादर केला आहे.
(II) भोर पोलीस स्टेशन-राज्यातील पोलीस स्टेशनच्या इमारती बांधकामाच्या प्राधान्यक्रमास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये भोर पोलीस स्टेशनच्या इमारतीचा समावेश आहे. याबाबत पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून कार्यवाही सुरु आहे. भोरसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्याचे काम चालू आहे.
(III)राजगड पोलीस स्टेशन- राजगड पोलीस स्टेशनच्या इमारतीकरीता पोलीस विभागाच्या नावे जागा उपलब्ध नाही. जिल्हाधिकारी, पुणे यांना प्रशासकीय इमारतीकरीता व निवासस्थानाकरीता भोरयेथील पोलीस विभागाच्या नावे असलेली गट क्र. १७५ / ब मधील ३ हे ६७ आर पैकी १ हे २० आर जागा महसूल विभागास हस्तांतरीत होऊन त्या बदल्यात राजगड पोलीस स्टेशनच्या नवीन प्रशासकीय इमारतकरीता व शासकीय निवासस्थानाकरीता राज्य परिवहन महामंडळाची राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ लगत चेलाडी येथील १ हेक्टर पर्यायी जागा मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.
(IV) वेल्हे पोलीस स्टेशन- जिल्हा नियोजन समितीकडून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ अंतर्गत शासकीय कार्यालय इमारत बांधकाम अंतर्गत वेल्हे पोलीस स्टेशनच्या प्रशासकीय इमारत बांधकामासाठी अंदाजीत रु.३९९.१२ लक्ष खर्चास दिलेल्या मान्यतेनुसार पोलीस ठाण्याच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरु केले आहे. तसेच अधिकारी व अंमलदार यांचे निवासस्थानाकरीता मौजे पानशेत तालुका वेल्हा भुमापन उपविभाग क्र.१८/००१ ते ०९ मधील १ हेक्टर जागा उपलब्ध होणेस जिल्हाधिकारी, पुणे यांना प्रस्ताव सादर केला आहे. राज्यातील पोलीस सेवा निवासस्थान प्रकल्पाच्या बांधकामास प्राधान्यक्रम व निकष ठरविण्याची कार्यवाही पोलीस महासंचालक स्तरावर सुरु आहे. सदर प्राधान्यक्रमाच्या यादीमध्ये पौंड येथे ६४, भोर येथे ३४, राजगड येथे २९ आणि वेल्हे येथे २५ निवासस्थानांचा समावेश केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दौंड तालुक्यातील (जि. पुणे) वीज उपकेंद्रे मंजूर करण्याबाबत

**(४०) ४८९८० (२०-०९-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरीऐंदी, वडगाव बांडे, राजेगाव, कानगाव, रोटी, (ता.दौंड, जि.पुणे) या ठिकाणी ३३ X ११ के. व्ही. क्षमतेचे

उपकेंद्र मंजूर करावे अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी दि. १५ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास ऊर्जा मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनने उक्त ठिकाणी ३३ X ११ के. व्ही. क्षमतेचे उपकेंद्रे मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) मौजे कानगाव तसेच मौजे बोरीऐंदी येथे नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्राच्या प्रस्तावास कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत तांत्रिक मंजूरी देण्यात आली असून मौजे राजेगाव व रोटी येथे नवीन ३३/११ केव्ही. (१x५ एमव्हीए) क्षमतेच्या उपकेंद्राच्या तांत्रिक प्रस्तावांचा समावेश (RDSS) सुधारीत वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत करण्यात आला आहे. तसेच मौजे वडगाव बांडे येथे नवीन ३३/११ के.वही. उपकेंद्राच्या प्रस्तावाची तांत्रिक सुसाध्यता पडताळणी क्षेत्रिय कार्यालय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(४१) ४९०६७ (२८-०९-२०२२). अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), अ‍ॅड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकडून टप्पा-२ मध्ये ५ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत निर्णय होऊन सुमारे ३ वर्षांचा कालावधी झाला असून अद्यापही सीसीटीव्ही लावण्याचे काम सुरू झालेले नसल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहिल्या फेजमधील ५ हजार सीसीटीव्ही लावण्यासाठी खड्डे खोदण्यासह लागणारा खर्च संबधित एल.अँड टी. कंपनीकडून करण्यात आला असून दुसऱ्या फेजमध्ये मात्र खड्डे खोदण्यासाठी ३०० कोटी रुपयांचा खर्च महानगरपालिका करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खड्डे खोदण्याचे काम महापालिकेला करावे लागणार असल्यामुळे सीसीटीव्ही लावण्याचे काम करण्यासाठी पालिकेस ३०० कोटींचा अतिरिक्त खर्च करावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हा अतिरिक्त खर्च टाळून सीसीटीव्ही लावण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही व उपाययोजना करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०२-२०२३) :** (१) मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्यात सुमारे २००० नाक्यांवर ४००० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम चालू आहे.
(२), (३) व (४) मुंबई सीसीटीव्ही प्रकल्पाच्या (फेज-२) खोदकामाचे (Trenching) शुल्क भरण्यापासून शासनास सूट मिळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेला निर्देश/सूचना देण्याकरीता नगर विकास विभागास विनंती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिवाण हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड प्रवर्तक यांना एका खाजगी रुग्णालयात हस्तांतरित करण्याबाबत

**(४२) ४९०८३ (०१-११-२०२२). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवाण हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड (DHFL) प्रवर्तक धीरज वाधवान यांना एका खाजगी रुग्णालयात हस्तांतरित करण्याचे निर्देश कारागृह प्रशासनाने जाणीवपूर्वक दिले असे विशेष सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन न्यायालयाने म्हटल्याचा गंभीर प्रकार माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) तसेच जे.जे. रुग्णालयासारख्या सरकारी रुग्णालयात उपचाराच्या सुविधा असतानाही सुपर-स्पेशालिटी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी वाधवान हे व्हेंटिलेटरवर वा कोमात नव्हते व या काळात त्यांच्यावर कोणतीही जटिल शस्त्रक्रिया वा गंभीर आरोग्यविषयक गुंतागुंत झाल्याचे कोणतेही संकेत नसताना त्यांना १५ महिने रुग्णालयात ठेवण्यात आल्याचा प्रकार निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०२३) :**(१), (२) व (३) ची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे :-

• न्यायाधीन बंदी धीरज वाधवान यांस आजारासंदर्भात प्रथमत: सर जे.जे. समुह रुग्णालये, मुंबई येथे दि. १६.१०.२०२० ते दि.०६.११.२०२० या कालावधीत वेळोवेळी उपचारार्थ पाठविण्यात आले होते.

• दि. १३.११.२०२० रोजी वर नमूद रुग्णालयात बंद्यास उपचारार्थ आंतररुग्ण म्हणून दाखल करण्यात आले असता, बंद्याने सदर ठिकाणी उपचार घेण्यास नकार देऊन, स्वत:हून दि. १४.११.२०२० रोजी डिस्चार्ज घेतला.

• परंतु, बंद्याची पत्नी श्रीम. पुजा वाधवान यांनी बंद्याच्या आजारासंदर्भात मा. राज्य मानवी हक्क आयोग यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला.

• मा. राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांनी दि. २१.१२.२०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार न्यायाधीन बंदी धीरज वाधवान यांस दि. २६.१२.२०२० ते दि. १५.०३.२०२१ पर्यंत के.ई.एम. रुग्णालय, मुंबई येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले होते.

• त्यानंतर, दि. ०६.०४.२०२१ रोजी फॉलोअपसाठी पाठविण्यात आले असता, बंद्यास के.ई.एम. रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

• सदर बंदी के.ई.एम. रुग्णालयात उपचारार्थ दाखल असतांना, मा.शहर सत्र न्यायालय यांच्या दि. ०१.०६.२०२१ रोजीच्या आदेशानुसार त्यास के.ई.एम. रुग्णालय, मुंबई येथून कोकीलाबेन धिरुभाई अंबानी हॉस्पिटल व मेडीकल रिसर्च सेंटर, अंधेरी येथे आंतररुग्ण म्हणून दि. ०२.०६.२०२१ ते दि. २५.०३.२०२२ पर्यंत आंतररुग्ण म्हणून दाखल होता.

• दरम्यान, मा. शहर सत्र न्यायालय, मुंबई यांच्या दि. २४.०३.२०२२ रोजीच्या आदेशानुसार बंद्यांस कोकीलाबेन धिरुभाई अंबानी हॉस्पिटल येथून सर जे.जे.समूह रुग्णालये, मुंबई येथे स्थलांतरीत करुन तेथे त्याची तपासणी करण्यात आली व दि. २५.०३.२०२२ रोजी बंद्यास पुन:श्च तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे दाखल करण्यात आले.

• तथापि, बंद्याने त्याचेवरील उपचार पूर्ण न झाल्याने, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे मा.सत्र न्यायालय, मुंबई यांच्या आदेशाविरुध्द रिट याचिका क्र.९४९/२०२२ दाखल केली होती.

• मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी बंद्यास दि. २१.०४.२०२२ रोजी कोकीलाबेन धिरुभाई अंबानी हॉस्पिटल व मेडीकल रिसर्च सेंटर, अंधेरी, मुंबई येथे Nasal Surgery चे औषधोपचार करणेबाबत दि. ०८.०४.२०२२ च्या आदेशान्वये आदेशित केले.

• बंद्याचे Nasal Surgery चे औषधोपचार पूर्ण झाल्यावर बंद्यास पुन्हा दि. ०६.०५.२०२२ रोजी तळोजा मध्यवर्ती कारागृहांत दाखल करण्यात आले. ही वस्तुस्थिती आहे.

सबब, मा. उच्च न्यायालय, मुंबई, मा. शहर सत्र न्यायालय, मुंबई व मा. राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई, यांच्या आदेशानुसार बंद्यावर सर जे.जे. रुग्णालय, के.ई.एम. रुग्णालय व कोकीलाबेन धिरुभाई अंबानी हॉस्पिटल व मेडीकल रिसर्च सेंटर, अंधेरी, मुंबई येथील रुग्णालयांत उपचार करण्यात आलेले आहेत. त्यामुळे, न्यायाधीन बंदी धिरज वाधवान यांस कारागृह प्रशासनाने जाणीवपूर्वक खाजगी रुग्णालयात हस्तांतरीत करण्याचे निर्देश दिले ही बाब खरी नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील ४० कंपन्यांतील सनदी लेखापाल व कंपनी सेक्रेटरी यांच्या मदतीने परदेशी नागरिकांच्या नावावर बेकायदा नवीन कंपन्यांचे हस्तांतर केल्याबाबत**

**(४३) ४९०९५ (०१-११-२०२२). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ४० कंपन्यांतील सनदी लेखापाल व कंपनी सचिव यांच्या मदतीने परदेशी नागरिकांच्या नावावर बेकायदा नवीन कंपन्यांचे हस्तांतर करण्यात आल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निबंधक कार्यालयाकडे या कंपन्यांची नोंदच झाली नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात कर चुकविण्यासाठी व आर्थिक गैरव्यवहारासाठी या बनावट कंपन्यांची स्थापना करण्यात आल्याचेही निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) मुंबईतील ३९ कंपन्यांतील सनदी लेखापाल व कंपनी सचिव यांच्या मदतीने परदेशी नागरिकांच्या नावावर बेकायदा नवीन कंपन्यांचे हस्तांतर केल्याबाबत उप निबंधक व सहायक निबंधक, कंपनी निबंधक कार्यालय, मुंबई यांनी आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे दिलेल्या तक्रारीवरून ३९ कंपन्यांच्या सनदी लेखापाल व कंपनी सचिव यांच्यांविरूध्द भारतीय दंड विधान, १८६० मधील कलम ४०६, ४२०, ४७७(अ), १२०(ब) सह कंपनी अधिनियम, २०१३ मधील कलम ४४७ व ४४८ अन्वये माहे एप्रिल व मे, २०२२ मध्ये ३९ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.
(२) नमूद ३९ कंपन्या या कंपनी निबंधक कार्यालय, मुंबई येथे नोंदणीकृत आहेत.
(३) आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे दाखल ३९ गुन्ह्यांचा तपास सुरू असून तपासामध्ये नमूद कंपन्यांनी कर चुकविण्यासाठी व आर्थिक गैरव्यवहारासाठी या बनावट कंपन्यांची स्थापना करण्यात आली आहे किंवा कसे याबाबत तपास करण्यात येत आहेत.
(४) कंपनी निबंधक कार्यालय, मुंबई येथील उप निबंधक व सहाय्यक निबंधक यांनी आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे ३९ कंपन्यांच्या विरूध्द दिलेल्या तक्रारीवरून ३९ गुन्हे नोंद करण्यात आलेले असून सदरच्या गुन्हयांचा तपास सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गणेगांव (ता.मुखेड, जि.नांदेड) येथील लेंडी नदीवर मातीच्या धरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) ४९३९६ (१२-१०-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गणेगांव (ता.मुखेड, जि.नांदेड) येथील लेंडी नदीवर मातीच्या धरणाचे काम भूसंपादन व निधी अभावी मागील ३६ वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य पुनर्वसन संनियंत्रण व पुन:स्थापना समितीच्या दिनांक १३ जुलै, २०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार प्रकल्प बाधितांच्या स्वेच्छा पुनर्वसनाचा जिल्हाधिकारी, नांदेड यांचा प्रस्ताव जलसंपदा विभागाने वित्त व नियोजन विभागाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाला होणाऱ्या विलंबामुळे प्रकल्प खर्चात वाढ होत असल्याने शासनाकडे प्राप्त प्रस्तावावर तातडीने निर्णय घेण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रकल्पबाधितांच्या तात्काळ पुनर्वसनासाठी जिल्हाधिकारी नांदेड यांच्या प्रस्तावास तातडीने मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१२-२०२२) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.सदर निर्णय महाराष्ट्र राज्य पुनर्वसन व संनियंत्रण व पुनर्स्थापना समितीच्या दि.१३.७.२०२१ च्या बेठकीत घेण्यात आला आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मुक्रमाबाद व इतर ११ गावांची स्वेच्छा पुनर्वसन व वाढीव कुटुंबास स्वेच्छा पुनर्वसनाबाबत दि.१३/०७/२०२१ रोजी महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीच्या बैठकीत स्वेच्छा पुनर्वसनास खालीलप्रमाणे मंजूरी प्रदान करण्यात आली आहे,

१) मौ.मुक्रमाबाद, ता.मुखेड, जि.नांदेड येथील बाधीत व्यक्तींचे स्वेच्छा पुनर्वसन करणे.

२) ज्या पुनर्वसित गावठाणामध्ये जमीन संपादित होऊ शकली नाही किंवा अंशत: जमीन संपादित झाल्यामुळे सर्व कुटुंबांच्या पुनर्वसनाकरिता जमीन अपूरी पडत आहे. त्यासर्व कुटुंबांचे स्वेच्छा पुनर्वसन करणे.

३) प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या सर्व १२ गावांतील वाढीव कुटुंबांचे स्वेच्छा पुनर्वसन करणे.

दि.२३/०३/२०२२ च्या शासन निर्णयान्वये उपरोक्त बाब क्र.१ करिता, मुक्रमाबाद येथील बाधीत कुटुंबांचे स्वेच्छा पुनर्वसन प्रस्तावास शासन मान्यता प्रदान केली आहे. दि.२०/१०/२०२२ च्या शासन निर्णयान्वये उपरोक्त बाब क्र.२ करिता, मुक्रमाबाद येथील ज्या पुनर्वसित गावठाणामध्ये जमीन संपादित होऊ शकली नाही किंवा अंशत: जमीन संपादित झाल्यामुळे सर्व बाधीत कुटुंबांचे स्वेच्छा पुनर्वसन प्रस्तावास कुटुंबांच्या पुनर्वसनाकरिता जमीन अपुरी पडत आहे, त्या सर्व कुटुंबांचे स्वेच्छा पुनर्वसन करण्याकरीता शासन मान्यता प्रदान केली आहे.

उपरोक्त बाब क्र.३ येथे नमूद "प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या सर्व १२ गावांतील वाढीव कुटुंबांचे स्वेच्छा पुनर्वसन करण्याच्या" अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने आवश्यक असून त्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाच्या क्षतिग्रस्त झालेल्या कालवा प्रणालीच्या दुरुस्तीच्या कामाबाबत

**(४५) ४९३९९ (१२-१०-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाच्या क्षतिग्रस्त झालेल्या कालवा प्रणालीच्या दुरुस्तीचे काम गोदावरी पाटबंधारे महामंडळ, औरंगाबाद यांचेमार्फत हाती घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे काम सर्व्हेक्षणाच्या टप्प्यावर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कामाच्या प्रस्तावांना मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तदनुसार उक्त कामे निश्चित कालावधीमध्ये पूर्ण करुन निधी त्वरीत उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३)सर्वेक्षणाअंती सविस्तर अंदाजपत्रकांना सक्षमस्तरावर मान्यता देऊन शासनाच्या प्रचलित कार्यपद्धती नुसार सदर प्रस्तावीत कामांची निधी मागणी करून क्षतीग्रस्त कामे करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाभळी (जि.नांदेड) येथील उच्च पातळी बंधाऱ्यासंदर्भात**

**(४६) ४९४०० (१२-१०-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील बाभळी उच्च पातळी बंधाऱ्यासंदर्भातील पाणीसाठयाबाबतची मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ च्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याचे फायदे संबंधित शेतकऱ्यांना मिळण्याकरीता पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना अधिक अधिकार मिळणेसाठी तेलंगणा राज्याच्या मुख्यमंत्र्यांसह चर्चा करुन सहमतीचा प्रस्ताव मा. सर्वोच्च न्यायालयात सादर करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री यांना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सहमतीचा प्रस्ताव मा. सर्वोच्च न्यायालयाकडे सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, उक्त बंधाऱ्याच्या पाणी साठयाचा लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३)तेलंगणा राज्याकडून मा. मुख्यमंत्री स्तरावरील बैठकीसाठी वेळ व दिनांक न मिळाल्याने सहमती बाबत चर्चा होऊ शकली नाही. त्यामुळे अद्यापपर्यंत सहमतीचा प्रस्ताव सादर करता आला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील उर्ध्व पेनगंगा ते निम्न पेनगंगा प्रकल्पाबाबत**

**(४७) ४९४०२ (१२-१०-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील उर्ध्व पेनगंगा ते निम्न पेनगंगा प्रकल्पापर्यंतच्या शिल्लक पाणी साठयातून नांदेड जिल्हयामध्ये सात उच्च पातळी बंधाऱ्यांची कामे घेण्यास शासनाच्या दिनांक १२ फेब्रुवारी, २०२१ रोजी निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या ७७ व्या नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये सदर बंधाऱ्यांचा समावेश उर्ध्व पेनगंगा प्रकल्पात करण्याची मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उच्च पातळी बंधाऱ्यांचा लाभ उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचे लाभक्षेत्रात होणार असल्याने या बंधाऱ्यांना उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचा भाग म्हणून मान्यता देऊन प्रकल्पाच्या पाचव्या सुधारीत मंजूरी पैकी शिल्लक रक्कमेतून निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधीनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदनुसार स्थानिक लोकप्रतिनिधीच्या विनंतीनुसार आवश्यक आदेश निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) होय, खरे आहे.
(४) पेनगंगा नदीवरील सातही उच्च पातळी बंधारे उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचा भाग म्हणुन प्रस्तावित सुप्रमा मध्ये समावेश करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रीगोंदा, (जि.अहमदनगर) तालुक्यात मोठ्या प्रमाणात विजेचा समस्या निर्माण झाल्याबाबत

**(४८) ४९४०९ (१४-१०-२०२२). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यात मोठ्या प्रमाणावर विजेची समस्या निर्माण झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिखली, घारगाव, हिरडगाव, राजापूर (ता.श्रीगोंदा) व कोल्हेवाडी (ता.नगर) या ठिकाणी नविन सबस्टेशन उभारण्याची मागणी सातत्याने करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीच्याअनुषंगाने विजेची समस्या दुरु करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.
अहमदनगर जिल्हयातील श्रींगोदा तालुका हा कृषी बहुल असून रब्बी हंगामात उच्चतम मागणीच्या काळात काही वेळा ११ के.व्ही. कृषी वाहिन्या अतिभारीत झाल्यामुळे योग्य दाबाने वीजपुरवठा सुरु ठेवताना तांत्रिक अडचणी निर्माण होतात. तथापि, ३३/११ के.व्ही. उपकेंद्रातील कॅपेसिटर बँक तसेच रोहित्रांवरील टॅप चेजिंग प्रणाली कार्यान्वित करुन योग्य दाबाने वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यात येतो.
(२) हे खरे आहे.
(३) अहमदनगर जिल्हयातील लोकप्रतिनिधीनी मागणी केलेल्या नवीन ३३/११ के.व्ही. चिखली उपकेंद्राचा तांत्रिक प्रस्ताव कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० अंतर्गत मंजूर करण्यात आला असून निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उपकेंद्राचे काम प्राधान्याने हाती घेण्याचे नियोजित आहे. तसेच ३३/११ के.व्ही. राजापूर उपकेंद्राच्या तांत्रिक प्रस्तावाचा समावेश ही सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS) अंतर्गत करण्यात आला आहे. भविष्यात श्रींगोदा तालुक्यातील वितरण प्रणाली सक्षम करण्याच्या दृष्टीने लोकप्रतिनिधींनी मागणी केलेल्या नवीन ३३/११ के.व्ही. घारगांव, हिरडगाव, कोल्हेवाडी उपकेंद्राचे तांत्रिक प्रस्ताव कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० योजनेअंतर्गत क्षेत्रिय कार्यालय स्तरावर तयार करण्याचे काम सुरु असून सदर प्रस्तावांची तांत्रिक सुसाध्यता पडताळणी मंजुरीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर कृषी आकस्मिक निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रधान मंत्री आवास योजना अंतर्गत 'पुणे मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट अथॉरिटी' या संस्थेमार्फत प्राप्त झालेल्या अर्जाबाबत

**(४९) ४९४२२ (१०-११-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगर प्रदेशांतर्गत पुणे जिल्ह्यातील ९ तालुक्यांतील ८१६ गावांमध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनेची (शहरी) अंमलबजावणी 'पुणे मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट अथॉरिटी (पीएमआरडीए) मार्फत करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत बीएलसी प्रकारांमध्ये पीएमआरडीए कडून मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल झाले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एकूण अर्जांची संख्या किती व आजतागायत एकूण प्राप्त अर्जांपैकी किती अर्जांचा समावेश DPR मध्ये करण्यात आला आहे,
(४) असल्यास, उक्त DPR मध्ये समाविष्ट अर्जांना केंद्रीय CSMC मध्ये मंजुरी मिळाली आहे काय, व प्रत्यक्षात किती घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे,
(५) असल्यास, उक्त घरांचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०२३) :** (१) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत पुणे महानगर विकास प्राधिकरणआंतर्गत केंद्रीय मान्यता व संनियत्रण समितीव्दारे एकूण २२ प्रकल्पांना मंजूरी मिळाली असून, सदर प्रकल्पांतील मंजूर घरकुलांची संख्या १९११२ इतकी आहे.
(२) पुणे महानगर विकास प्राधिकरणाचा प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) राबविण्यासाठी डिसेंबर-२०१७ मध्ये समावेश करण्यात आला. तसेचBLC अंतर्गत लाभार्थ्याकडून ऑनलाईन पध्दतीने www.pmaypmrda.in संकेतस्थळावर माहे ऑगस्ट, २०१८ पासून अर्ज मागविण्यात आले होते.
(३) व (४) पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर एकूण १,०८,००० अर्ज प्राप्त झाले आहेत.तसेच केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने एकूण १९११२ घरकुलांना मान्यता दिली असून, त्यापैकी २५० घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे.
(५) घरकुलांची कामे पुर्ण करणेबाबत लाभार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन व पत्राव्दारे कळविण्यात आले असल्याचे व त्याअनुषंगाने पाठपुरावा करण्यात येत असल्याचे पुणे महानगर विकास प्राधिकरणाने कळविले आहे
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्यात निती आयोगाच्या सहकार्याने परिवर्तन संस्था स्थापन करण्याचा प्रस्तावाबाबत**

**(५०) ४९४४० (१०-११-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निती आयोगाच्या धर्तीवर राज्याचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीकोनातून सदरहू आयोगाच्या सहकार्याने परिवर्तन संस्था स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त संस्थेच्या माध्यमातून राज्यात पायाभूत सुविधांसह विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणे अपेक्षित असल्याने शासनाकडून अद्यापपर्यंत किती रोजगार निर्मिती करण्यात आली,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने राज्यात उक्त आयोगाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करिता परिवर्तन संस्था स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२२) :** (१) होय. नीति आयोगाच्या धर्तीवर राज्यात महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) या संस्थेची स्थापना दि. ११.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) राज्याच्या विकासाला धोरणात्मक, तांत्रिक तसेच कार्यात्मक दिशा देणारा विचार गट (Think Tank) म्हणून "मित्र" ही संस्था कार्यरत राहणार आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.